रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २५१
www.ramprahar.com

शनिवार, २९ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग

रोह्यात सहा बंद घरे फोडली; लाखोंचा ऐवज लंपास/२

पनवेल मनपा हद्दीतील सात शाळा अनधिकृत/३

रामशेठ ठाकूर विद्यालयाची क्रीडा स्पर्धेत कामगिरी/८

## आजपासून मिळणार नमो शेतकरी योजनेचा हफ्ता



**मुंबई :** 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'च्या सहाव्या हप्त्यांतर्गत शनिवार (दि.२९) पासून ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबांना लाभ वितरित केला जाणार आहे. या अंतर्गत २१६९ कोटींची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रिय बँक खात्यात ३१ मार्च २०२५ पर्यंत थेट जमा होणार आहे. यासंदर्भातील माहिती महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना फेब्रुवारी, २०१९ पासून सुरू केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास २००० रुपये प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी ६००० रुपये त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे.

# राज्यातील गोशाळांना शासनाचे बळ

## देशी गोवंश परिपोषण योजनेतून २५ कोटी ४४ लाखांचे अनुदान

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात आले.

जानेवारी, फेब्रुवारी व मार्च असे तीन महिन्यांचे अनुदान आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रती गाय ५० रुपये अनुदान योजनेंतर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण



कार्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य गोसेवा आयोगाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विभागाचा विकास गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधीक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या असून, देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरू असलेले काम प्रशंसनीय आहे. यामुळे देशी गोवंश संरक्षण व संवर्धन होणार असल्याचे, म्हटले आहे.

देशी गायींची उत्पादनक्षमता कमी आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड–अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नाही. असे पुशधन गोशाळेत ठेवण्यात येतात. **(पान २ वर..)**

### असे आहे योजनेचे स्वरूप

*महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळांतील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रती दिन अनुदान देय राहिल. अनुदानाची रक्कमः रुपये ५० /– प्रती दिन प्रती देशी गाय असे आहे.*

# आदिवासी समाजावर अन्याय होऊ देणार नाही -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोणत्याही परिस्थितीत आदिवासी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. सिडकोला योग्य तो मोबदला तुम्हाला द्यावाच लागेल, अशी भूमिका माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि.२८) गौळवाडी येथील प्रकल्पग्रस्त आदिवासी समाजाकडे व्यक्त केली.

करंजाडे ग्रामपंचायतच्या हद्दीत असलेल्या गौळवाडी येथील आदिवासी वस्तीमधली घरे तोडण्याकरिता सिडको आपला फौज फाटा घेऊन गौळवाडी येथे आले होते. दरम्यान या आदिवासी कोणतीही कारवाई करू नये याकरिता पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाला यश आले असून सिडकोला कारवाई न करताच माघे



फिरवू लागले. ही आदिवासी वाडी करंजाडे सेक्टर तीन येथे चाळीस वर्षापासून विशेष म्हणजे घरकुल योजनेंतर्गत ही घर येथे बांधण्यात आली आहेत दर्शना भोईर यांनी सिडकोला या संदर्भात कडाडून विरोध केला.

यासंदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली येत्या काही दिवसांत सिडकोसोबत बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. या बैठकीत आदिवासी बांधवांना नक्कीच न्याय मिळेल, अशी भावना माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी व्यक्त केली.

दरम्यान, शुक्रवारी गौळवाडी येथे राहणाऱ्या प्रकल्पग्रस्त आदिवासी समाजाच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निवेदन देण्यात आला आहे. कोणत्याही परिस्थितीत आदिवासी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. सिडकोला योग्य तो मोबदला तुम्हाला द्यावाच लागेल, अशी भूमिका या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केली.

# महाडमधून जहाल नक्षलवाद्याला अटक

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील कांबळे तर्फे बिरवाडी या गावातून जहाल नक्षलवाद्याला पकडण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली असून बिहार स्पेशल टास्क फोर्स आणि महाड एमआयडीसी पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत या नक्षलवाद्याला ताब्यात घेतले आहे.



महाड तालुक्यातील कांबळे तर्फे बिरवाडी या गावातून गुरुवारी (दि.२७) मध्यरात्रीच्या सुमारास एका जहाल नक्षलवाद्याला अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. महाड एमआयडीसी पोलीस व बिहार स्पेशल टास्क फोर्स यांनी ही संयुक्त कारवाई केली आहे. संबंधित आरोपीवर २०१४ मध्ये बिहार येथे देशद्रोहाचा गुन्हा दाखल आहे. मागील काही महिन्यापूर्वी महाड एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीमध्ये बांगलादेशी घुसखोरांनादेखील अटक करण्यात आली होती, तर खून करून पळून आलेला मध्यप्रदेश येथील आरोपीदेखील महाड तालुक्यातच सापडल्याने सर्वत्र खळबळ पसरली आहे.

केंद्रीय गृहमंत्री १२ एप्रिल रोजी महाड येथे येत असुन त्याच काळात ही कारवाई झाल्याने अनेक कारणे पुढे येत आहेत. महाड हे ऐतिहासिक ठिकाण असून आता गुन्हेगारांचे आश्रय स्थान होत आहे की काय, अशी भिती स्थानिक व्यक्त करीत आहेत.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या वावंजे येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, कै. गोटीरामशेठ पाटील कॉमर्स व सायन्स ज्युनिअर कॉलेज व श्री. लक्ष्मण अर्जुन पाटील इंग्लिश मीडियम स्कूल या संकुलातील नवीन इमारतीचे उद्घाटन शुक्रवारी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते झाले. शाळेच्या वतीने त्यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी सोहळ्याचे अध्यक्ष व संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सल्लागार अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, उद्योजक जे.एम.म्हात्रे, माजी आमदार बाळाराम पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, शाळेचे चेअरमन जी.आर. पाटील आदींची उपस्थिती लाभली.**

## निवडक

### शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात वाढ

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी दिली आहे. सरकारने महागाई भत्ता (डीए) आणि पेन्शनधारकांसाठी महागाई मदत (डीआर) मध्ये २ टक्के वाढ करण्यास मान्यता दिली आहे. ही वाढ १ जानेवारीपासून लागू होईल. याचा फायदा सुमारे ४८.६६ लाख सरकारी कर्मचारी आणि ६६.५५ लाख पेन्शनधारकांना होणार आहे.

### रिक्षा, टॅक्सी भाडेवाढ; १ एप्रिलपासून नवे दर लागू

**अलिबाग :** प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, रायगडच्या बैठकीत ऑटोरिक्षा आणि मीटर टॅक्सीच्या भाडेदर वाढीला मंजुरी देण्यात आली आहे. १ एप्रिल २०२५ पासून नवे दर लागू होणार असून, वाहनचालकांना मीटर रिकॅलिब्रेशन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मीटर टॅक्सी प्रति किलोमीटर भाडे १८.६६ रूपये वरून २०.६६ रूपये करण्यात आले आहे. ऑटोरिक्षा प्रति किलोमीटर भाडे १५.३३ रुपयावरून १७.१४ रुपये करण्यात आले आहे.

# किल्ले रायगडावर शिवरायांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाची तयारी

## मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला आढावा



**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमासाठी दुर्गराज रायगडावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा दौरा १२ एप्रिल रोजी प्रस्तावित आहे. या दौऱ्याच्या पूर्वतयारीचा आढावा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला.

या आढावा बैठकीला दुर्गराज किल्ले रायगड येथे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, रोहयो मंत्री भरत गोगावले, माजी मंत्री व भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार प्रवीण दरेकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आणि किल्ले परिसराची पाहणी केली.

सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम आणि पाणी पुरवठा विभाग, महावितरण, भारतीय पुरातत्व विभाग, आरोग्य विभाग, गृह विभाग यांच्या माध्यमातून आवश्यक ती कामे गड आणि गड परिसरात सुरू आहेत. याची पाहणी केली आणि माहिती घेतली.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमांची पूर्वतयारी, प्रोटोकॉलनुसार त्यासाठी गड परिसर आणि गडावर विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात असेही मंत्री पाटील यांनी सांगितले. पुण्यतिथी कार्यक्रमाची सर्व तयारी प्रशासनाने करताना उन्हाची परिस्थिती लक्षात घ्यावी. त्यासाठी आवश्यक नियोजन करावे अशा सूचनाही या वेळी त्यांनी केल्या. किल्ल्यावर जाण्यापूर्वी मंत्री महोदयांनी पाचाड येथील राजमाता जिजाऊ यांच्या समाधी स्थळास भेट दिली व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## रोह्यात सहा मुलींचा विनयभंग; आरोपी शिक्षकावर गुन्हा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील चणेरा विभागातील एक शाळेत चक्क शिक्षकाने तब्बल सहा अल्पवयीन शाळेतील मुलींवर त्यांच्या इच्छेविरुद्ध कृत्य केल्याची घटना उघडकीस आली आहे. तर आरोपीविरोधात विनयभंग केल्याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचे नाव अनिल कुंभार (रा. चणेरा, ता. रोहा) असुन तो पेशाने शिक्षक आहेत.

दरम्यान, चणेरा येथील एक इंग्लिश स्कूलमध्ये सकाळी ८.३० ते ९च्या सुमारास शाळेतील वर्गामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षक अनिल कुंभार शिकवत असताना मुली बेंचवर बसलेल्या असताना त्यांच्या इच्छेविरुद्ध पाठीमागून मुलींच्या अंगावर नको ते कृत्य केले. **(पान २ वर..)**

# मुख्यमंत्र्यांच्या बदनामीप्रकरणी पनवेल पोलिसांत गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जुन्या भाषणाचा अर्धवट व्हिडीओ 'आम्ही पनवेलकर' व्हॉट्सॲप समूहावर प्रसारित करून समाजात दंगे माजविण्याचा प्रयत्न केल्याचा ठपका ठेवून पनवेल शहर पोलिसांनी नाखवा अबू बकर या नावाने प्रोफाईल असलेल्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात व्हिडिओ व्हॉट्सअप ग्रुपवर पोस्ट केल्याने भाजप युवा कार्यकर्ते देवांशू संतोष प्रभाळे (रा. समर्थ कृपा बिल्डिंग, पनवेल) यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आम्ही पनवेलकर या व्हॉट्सप ग्रुपवर मुख्यमंत्र्यांच्या भाषणाचा आणि समाजामध्ये द्वेषाची भावना आणि गटातटात दंगलीची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा व्हिडीओ पोस्ट केला. आणि त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र अशा भावना व्यक्त झाल्या. त्या अनुषंगाने या प्रकरणी नाखवा अबू बकर (व्हॉट्सॲप क्रमांक ९६९९१५१३९०) आणि एका महिलेविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

समाजात अफवा पसरविणे, शांतता भंग केल्याचा गुन्हा नोंदवला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक अभय कदम हे तपास करीत आहेत. पोलिसांनी या प्रकरणी अधिक तपास सुरू केला असून संबंधित आरोपींचा शोध घेत आहेत.

# मोहो येथे विकासकामांचा धडाका

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात विविध विकास कामांचे भूमिपूजन शुक्रवारी (दि.२८) झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू झाली आहेत या अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वांगणी तर्फे वाजे हद्दीतील मोहो येथे सुमारे ३५ लाखांच्या कामांची भूमिपूजन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या उद्घाटन समारंभाला उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, उपसरपंच अक्षता म्हात्रे, माजी उपसरपंच प्रमोद म्हात्रे, माजी सरपंच गुरुनाथ भोईर, माजी सरपंच अनंता पाटील, प्रवीण म्हात्रे, राहुल पाढे, चेतन मोरे, जयेश पाटील, अंकित म्हात्रे, भास्कर पाटील, अनिल मस्कर, गणेश मस्कर, मोतीराम पाटील, रामदास पाटील, अरविंद म्हसकर, रवींद्र पाठे, रोहित पाठे, सुनील पाटील, प्रशांत पाटील, नितीन मोरे, तुळशीराम पाठे, विनोद पाठे, गणेश पाटील, केशव पाटील आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत मोहो येथे अंतर्गत आरसीसी गटाराचे बांधकामासाठी १५ लाख रुपये, अंतर्गत काँक्रीट करण्यासाठी दहा लाख रुपये तर सिमेंट पाईप लाईन गटार बांधण्यासाठी नऊ लाख रुपयांचा निधी देण्यात आला असून जवळपास ३४ लाखांची विकास कामे मोहो येथे होणार आहेत.

## राज्यातील ६४ लाख शेतकऱ्यांना मिळणार नुकसानभरपाई –कृषीमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील तब्बल ६४ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असून, त्यांच्या खात्यावर थेट २५५५ कोटी रुपये विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान म्हणून २८५२ कोटी रुपये वितरित करण्यास मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे मागील विविध हंगामांतील प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा होणार आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना विमा कंपन्यांना देण्यात आल्या असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

शासनाने विमा कंपन्यांना निधी वितरित केला असून, नुकसान भरपाईची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, असे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले.

# म्यानमारमध्ये शक्तिशाली भूकंप

## भारत शक्य ती मदत करणार -पंतप्रधान मोदी

**म्यानमार : वृत्तसंस्था**

म्यानमारमध्ये झालेल्या शक्तिशाली भुकंपामुळे जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शुक्रवारी (दि.२८) सकाळी ११.५० च्या सुमारास म्यानमारमध्ये ७.७ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. या भूकंपाचा प्रभाव भारत, थायलंड, बांगलादेश आणि चीनसह पाच देशांमध्येही जाणवला.

म्यानमार आणि थायलंडमध्ये १६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. म्यानमारमधील या तीव्र भूकंपानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चिंता व्यक्त केली आहे. म्यानमारच्या मदतीसाठी भारत मदतीसाठी पूर्णपणे तयार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले.

शुक्रवारी सकाळी म्यानमारमध्ये ७.७ रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू मंडाले शहराजवळ होता. या भूकंपामुळे इमारती आणि अनेक घरे



उद्ध्वस्त झाली. म्यानमारमध्ये भूकंपामुळे १३ जणांचा मृत्यू झाला. तर २०० लोक जखमी झाले आहेत. थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये बांधकामाधीन असलेली ३० मजली इमारत कोसळली. या साइटवर ४०० लोक काम करत होते. यापैकी ८० लोक बेपत्ता आहेत, तर तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

दरम्यान, दिल्ली, नोएडा, गाझियाबाद, गुरुग्राम आणि आसपासच्या परिसरात १५–२० सेकंद भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचा केंद्रबिंदू म्यानमार होता. भारतात आतापर्यंत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

# पनवेलमध्ये सात शाळा अनधिकृत

## ◆ महापालिकेतर्फे प्रवेश न घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात शासनाच्या परवानगी शिवाय सुरू असलेल्या प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात येत आहे. सर्व संबंधित पालकांना महापालिकेच्यावतीने आयुक्त प्रशासक मंगेश चितळे यांनी सूचित केले आहे की, त्यांनी या अनधिकृत शाळांमध्ये आपल्या पाल्याचे प्रवेश घेवू नये. सदर शाळेतील विद्यार्थ्यांचे नजिकच्या अन्य मान्यता प्राप्त शाळेत समायोजन करण्यात येईल. संबंधित अनधिकृत शाळांविरूध्द दंडात्मक कारवाई केली जाईल.

शाळांचे प्रवेश (अॅडमिशन) सुरू होण्यापूर्वी व शाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेच्या वतीने पालिका कार्यक्षेत्रातील ७अनधिकृत शाळांची नावे घोषित करण्यात येत आहेत. यामध्ये मार्शमेलोज इंटरनॅशनल स्कूल ओवे, काळसेकर इंग्लिश मिडियम स्कूल तळोजा पाचनंद, अर्कम इंग्लिश स्कूल तळोजा, ओशीन ब्राईट कॉनव्हेंट स्कूल तळोजा, ऑक्सफोर्ड इंग्लिश मिडियम स्कूल कळंबोली, बजाज इंटरनॅशनल स्कूल तळोजा, दि वेस्ट हिल हाय. इंटरनॅशनल स्कूल तळोजा या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा समावेश आहे.

पालकांनी आपल्या पाल्याचे प्रवेश (डमिशन) या शाळांमध्ये करू नये, असे आवाहन उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांनी केले आहे. जर या शाळांमध्ये अगोदरच प्रवेश झाले असतील तर ते प्रवेश अधिकृत शाळेत होण्यासाठी इतर नजीकच्या शाळेत समायोजन करण्याचे नियोजन करण्यात येईल. यानंतरदेखील काही अनधिकृत शाळा आढळून आल्यास त्यांची नावे घोषित करून त्यांच्यावरही नियमानुसार कारवाई करण्यात येईल, अशी माहिती शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी दिली आहे.

**पनवेल महापालिका हद्दीतील अनधिकृत शाळांची यादी**

१. मार्शमेलोज इंटरनॅशनल स्कूल, ओवे
२. काळसेकर इंग्लिश मिडियम स्कूल, तळोजा पाचनंद
३. अर्कम इंग्लिश स्कूल, तळोजा
४. ओशीन ब्राईट कॉनव्हेंट स्कूल, तळोजा
५. ऑक्सफोर्ड इंग्लिश मिडियम स्कूल, कळंबोली
६. बजाज इंटरनॅशनल स्कूल, तळोजा
७. दि वेस्ट हिल हाय इंटरनॅशनल स्कूल, तळोजा



पनवेल : जेजुरी येथील भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी पुणे जिल्हा भाजपचे चिटणीस प्रताप अत्रे, पुरंदर तालुक्याचे उपाध्यक्ष हरिश्चंद्र भापकर, पुरंदर तालुक्याचे सरचिटणीस स्वानंद अत्रे, पुणे अनुसूचित जाती जमातीचे मार्चाचे सरचिटणीस मयुरेश दोडके, पारगावचे माजी सरपंच महेंद्र पाटील उपस्थित होते.



पनवेल : शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी येथे सुरू झालेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंडच्या शोरूमचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप प्रदेश कामगार संघटनेचे मोर्चाचे सचिव संजय भगत आदी उपस्थित होते.



पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या मार्केट यार्ड येथील शाळेत डि. सी. पाटील यांची मुख्याध्यापक म्हणून नव्याने नियुक्ती झाल्याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्सना ठाकूर, पारगाव शाळेच्या मुख्याध्यापिका पी.आर. ठाकूर, 'रयत'चे लाईव्ह वर्कर एम.आर. पाटील आदी उपस्थित होते.

## निवडक

### जप्त वाहनांचा आज लिलाव

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाणे गु. रजि. नं. ८४/२००८,भादवी कलम ४०७, ३४ या गुन्ह्यात जप्त असलेल्या वाहनांचा लिलाव २९/३/२०२५ रोजी तळोजा पोलीस ठाण्याच्या आवारात होणार असल्याची माहिती तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांनी दिली. या प्रकरणात दोन टोरेस ट्रक गुन्हे प्रकरणी जप्त झालेले आहेत. दोन्ही ट्रकचा चॅसिस व इंजिन नंबर दिसून येत नाही. या लिलावात भाग घ्यायचा असल्यास तळोजा पोलीस ठाण्याचे व. पो. नी. भगत किंवा पोलीस हवालदार निवळे (०२२-२७४१२३३३) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ६५ हजार रुपयांची चोरी

**पनवेल :** चोराने घरात प्रवेश करून घरातून ६५ हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत. संदीप तांडेल हे नवीन पनवेल येथे राहत असून त्यांचे मूळ गाव पाले बुद्रुक आहे. २२ मार्च रोजी ते पाले बुद्रुक येथे गेले होते. त्यानंतर रात्री लॉक करून ते पनवेल येथे आले. २३ मार्च रोजी बंगल्याच्या दरवाज्याचे कडी कोयंडा तोडून घरामध्ये चोरी झाल्याचे समजले. या वेळी त्यांच्या घराचे कपाट उघडे दिसले. चोराने त्यांच्या रूम मधील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले ६५ हजार रुपये चोरून नेले.

### घरफोडी करून दागिन्यांची चोरी

**पनवेल :** खांदा कॉलनी येथे चोराने घरात प्रवेश करून जवळपास साडेचार लाख रुपयांचे सोन्याचे दागिने घरफोडी करून नेले. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. दैवशाला कसबे ह्या सेक्टर ७, खांदा कॉलनी येथे राहत असून २४ मार्च रोजी त्या कामावरून दीड वाजता दुपारी घरी आल्या. या वेळी लाकडी दरवाजाची कडी तुटलेली दिसली. त्यांनी घरात जाऊन पाहिले असता बेडरूम मधील कपाटाचे लॉक तोडलेले आणि सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांना कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने सापडून आले नाहीत. अनोळखी व्यक्तीने घरात प्रवेश करून साडेचार लाख रुपयांचे दागिने चोरून नेले.

### 'सांजधारा'चे होणार प्रकाशन

**मोहोपाडा :** रसायनी मोहोपाडा पाताळगंगा परिसरातील कवी अनिल दाभाडे यांचा पहिला काव्यसंग्रह सांजधारा हा लवकरच प्रकाशित होणार असल्याचे त्यांनी आमच्या बातमीदाराशी बोलताना सांगितले. सांजधारा... या काव्यसंग्रहामध्ये विविध विषयावर कविता प्रकाशित होणार आहेत. पुण्यातील नामवंत अशा महाजन प्रकाशन तर्फे हा सांजधारा काव्यसंग्रह प्रकाशित होणार आहे. यापूर्वी अनिल दाभाडे यांचा कुणीतरी... हा चारोळी संग्रह प्रकाशित झालेला आहे.

## कोपरा पूल येथे एसटीची कारला धडक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अहमदनगरहून दादरला जाणाऱ्या एसटीवरील चालकाचे नियंत्रण सुटून बसने कारला धडक दिल्याची घटना पनवेल-सायन महामार्गावर खारघर-कोपरा पूल येथे गुरुवारी दुपारी घडली.

एसटी बस (एमएच १३ सीयू ६८६३) भरधाव वेगाने जात असताना महामार्गावरील डाव्या बाजूला चालत असलेल्या कारला मागून धडक दिल्याने कार जागेवर गोल फिरली. आणि रस्त्याच्या उजवीकडील डिव्हायडरला धडकली. या धडकेत कारचे मोठे नुकसान झाले असून डिव्हायडर वरील सिमेंट ब्लॉकचे तुकडे झाले आहेत. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून कारचे मोठे नुकसान झाले आहे.

या अपघातात कारमध्ये पाच प्रवासी होते. कार (एमएच ०९ एफयु २०३०) मुंबईच्या दिशेने जात असताना खारघर कोपरा पूल येथे हा अपघात झाला. अपघातामुळे महामार्गावर २-३ किलोमीटर पर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. घटनास्थळी खारघर वाहतूक पोली अमलदार किरण कदम व सुहास गुरव यांनी तत्काळ अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करून रस्त्यावरील सांडलेल्या गाडीतील ऑईलवर माती टाकून वाहतूक सुरळीत केली. याबद्दल तेथील जमावाने पोलिसांचे कौतुक केले.

## चाकूचा धाक दाखवून ८९० लिटर डिझेलची चोरी

**पनवेल :** मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेच्या बाजूला अमेटी युनिर्व्हसिटीसमोर चाकूचा धाक दाखवून व मारण्याची धमकी देवून तीन वाहनांमधून ८९० लिटर डिझेलची चोरी अज्ञात चोरट्यांनी करून सदर चोरटे पसार झाले आहेत.


टेम्पो चालकाला झोप येत असल्याने टेम्पोचालकाने अमेटी युनिर्व्हसिटीसमोरील मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेच्या बाजूला टेम्पो (एमएच-४२-एक्यू-९५३७) उभा करून ठेवला असता व इतर कंटेनर (एनएल-०१-एएच-०२२४), ट्रेलर (एमएच-१२-बीएफ-४२८८) अशा तीन वाहनांमधून चाकूचा धाक दाखवून व मारण्याची धमकी देत अज्ञात चार चोरट्यांनी ८९० लिटर डिझेल (किंमत ८१ हजार ८८०) चोरून नेले आहे.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून अधिक तपास सपोनि गौरव इंगोले करीत आहेत.

# पनवेल मनपाची कर वसुली मोहीम

## थकबाकीदारांच्या मालमत्ता अटकावणीस सुरूवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे चार दिवस राहिल्याने महापालिकेने वसुलीसाठी धडक मोहिम जोमाने सुरू केली आहे. पनवेल महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्ती पूर्व नोटीसांबरोबर वॉरंट नोटीसा दिल्यानंतर आता अटकावणी करण्यावरती भर देण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून चारही प्रभागात अटकावणीवरती भर देण्यात आला असून आत्तापर्यंत १३२ अटकावण्या करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, गेल्या काही दिवसापासून मालमत्ता कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढला असून गेल्या चार दिवसात सुमारे दहा कोटींचा भरणा पालिकेच्या तिजोरीत झाला आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेप्रमाणे जप्तीपुर्व नोटीसानंतर सात दिवसांचा कालावधी पुर्ण होऊनही मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांनी मालमत्ता कर भरावा यासाठी धडक मोहिम सुरू करण्यात आली आहे.

आतापर्यंत पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे ४४७ जप्तीपूर्वीच्या नोटीसा व २७ वॉरंट नोटीसांचे वाटप थकबाकीदार मालमत्ता धारकांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सुचनेनूसार जप्ती मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून, जप्ती नोटीस दिलेल्या थकबाकीदारांकडून वसुलीसाठी वसुली पथके भेटी देत आहेत. परिणामी नागरिकांचा मालमत्ता कर भरण्याचा प्रतिसाद वाढू लागला आहे. करअधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली वसुली पथकाच्या माध्यमातून चारही प्रभागातून उच्चांकी वसुली केली जात आहे. या आर्थिक वर्षांतील एकुण वसुली ३९४ कोटी झाली आहे.

दरम्यान मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने तसेच नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महापालिका विविध माध्यमातून करत आहे. या आवाहनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे. नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पध्दतीने भरता यावा यासाठी महापालिकेने 'सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड' तयार केले आहे.

महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल अॅप विकसित केले आहे. तसेच www. panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## पनवेल शहर पोलिसांनी १८ लाखांचे मोबाईल केले परत



**पनवेल : वार्ताहर**

विविध राज्यातुन हस्तगत केले हरविलेले १८,३८, ३४८ रूपये किंमतीचे एकुण ६७ मोबाईल फोन नवी मुंबई आयुक्तालर्योंगत सेन्ट्रल सीईआयआर पोर्टचा प्रभावीपणे वापर करून मोबाईल चोरीचा सामना करण्यासाठी तसेच गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरीता आणि मोबाईल सुरक्षा वाढविण्याकरीता हा प्रोजेक्ट राबविण्यात आला होता. त्या अनुशंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई हद्दीतील सन २०२५ माहे मार्च पर्यतचे गहाळ झालेल्या मोबाईल पैकी एकूण ६७ मोबाईलचा CEIR> पोर्टलद्वारे पनवेल शहर पोलीसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना हस्तांतरण केलेबाबत

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अप्पर पोलीस आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, पनवेल प्रशांत मोहीते, सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग अशोक राजपुत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील हरविलेले मोबाईल फोन याबाबतची तक्रार नोंदविण्याकरीता नागरीकांना भारत सरकारद्वारे सीईआयआर पोर्टल सुरू करण्यात आले आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोनि शाकिर पटेल, पोनि अभिजीत अभंग यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे सपोनि प्रकाश पवार, पोउपनि विनोद लभडे सपोनि प्रकाश पवार, पोउपनि विनोद लभडे, पोहवा यशवंत झांझम, अविनाश गंथडे, नितीन वाघमारे परेश म्हात्रे, अमोल डोईफोडे, महेंद्र वायकर, महेश पाटील, अमोल पाटील, संदेश म्हात्रे, तुषार बोरसे, विनोद देशमुख, मिथुन भोसले, विशाल दुधे, किरण कराड, चंद्रशेखर चौधरी, वैभव शिंदे, प्रविण पाटील यांनी विविध राज्यातुन आतापर्यत १८,३८,३४८ रूपये किंमतीचे एकुण ६७ मोबाईल हस्तगत केले आहेत. हस्तगत मोबाईल फोन हे मोबाईलचे मुळ मालक यांना पोलीस ठाणे येथे बोलावुन त्यांचे मोबाईल वरिष्ठांच्या हस्ते सन्मानपुर्वक परत करण्यात आलेले आहे.

मोबाईल फोन परत मिळालेल्या नागरिकांनी जनमानसातील पोलिसांची प्रतिमा उंचावल्याबाबत पोलीस मानुन कौतुक केले आहे.

## काळसेकर टेक्निकल कॅम्पसचा आकार २०२५ स्पर्धेत विजय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-इ-इस्लामच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पस - स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (सिव्हिल विभाग)च्या विद्यार्थ्यांनी आयआयटी बॉम्बे येथे आयोजित आकार (AAKAAR)२०२५, आशियातील सर्वात मोठ्या सिव्हिल इंजिनीअरिंग महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी करून प्रतिष्ठित पुरस्कार आणि मोठे रोख बक्षीस जिंकले.

विद्यार्थ्यांनी ब्रिज BQ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत ५०,००० रोख बक्षीस पटकावले, ज्यामध्ये त्यांनी २८.३८ किलो भार सहन करणारा संरचनात्मकदृष्ट्या उत्कृष्ट पूल डिझाईन केला. त्याचप्रमाणे, पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत देखील प्रथम क्रमांक मिळवत १५,००० चे रोख बक्षीस जिंकले, ज्यामध्ये त्यांनी भारताच्या स्मार्ट सिटी मिशनसाठी जागतिक रेटिंग प्रणाली या विषयावर संशोधन सादर केले. तसेच, सिमेंट काँक्रीट तंत्रज्ञान स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत २५,००० रुपयांचे रोख बक्षीस मिळवले, जिथे त्यांनी हलक्या वजनाचा नवीन काँक्रीट मिश्रण विकसित करण्याची चमकदार कामगिरी केली.

या यशामागे अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. झहीर आय काझी, कार्यकारी अध्यक्ष (नवी मुंबई) बुरहान हारिस, कॅम्पस संचालक डॉ. रामजान खातिक, डीन डॉ. राजेंद्र मागर, सिव्हिल विभाग प्रमुख डॉ. फवाज पारकर, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक डॉ. रोहन दासगुप्ता आणि समन्वयक यांचे मोलाचे योगदान आहे.



## लायन्स सरगम कराओके स्पर्धा



**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे आयोजित लायन्स सरगम कराओके स्टार २०२५ स्पर्धेची अंतिम फेरी गोखले हॉल पनवेल येथे यशस्वीरित्या झाली.

एकूण पाच गटांत आलेल्या या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीमध्ये ९० पेक्षा जास्त स्पर्धक रायगड, नवी मुंबई, ठाणे आणि मुंबई येथुन सहभागी झाले होते त्यापैकी अंतिम फेरीमध्ये ५० स्पर्धकांची निवड झाली होती. वयोगट १७ पर्यंत प्रथम निव कनानी, द्वितीय तनिषा चव्हाण, उत्तेजनार्थ आराध्या शिंदे, वयोगट १८ ते ४० प्रथम करण म्हात्रे, द्वितीय कल्याणी तुपे, उत्तेजनार्थ मानसी कदम, वयोगट ४१ ते ६० प्रथम शिवदास नाखवा, द्वितीय सुबीर गोल्डर, तृतीय अभिषेक देव, उत्तेजनार्थ रुपेश कदम आणि कांचन देशमुख, वयोगट ६१ पेक्षा जास्त प्रथम राज गौड, द्वितीय डॉ. आशिष शेटे, उत्तेजनार्थ दत्तात्रय ढोले. लायन सभासद प्रथम किरण बाबरे, द्वितीय सुरभी पेंडसे. अतिशय चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणुन सुकुमार साखरदांडे आणि मुश्ताक खान यांनी काम पाहिले.

स्पर्धेचे उद्घाटन मोहिनी तनेजा यांनी केले तर सर्व बक्षीस विजेत्यांना प्रमुख पाहुणे प्रथम प्रांतपाल संजीव सुर्यवंशी, अध्यक्ष मानदा पंडित, रिजन चेअरमन सुयोग पेंडसे, झोन चेअरमन अल्केश शहा, मायक्रो कॅबिनेट मेंबर संजय गोडसे तसेच प्रेमेंद्र बहिरा आणि स्वाती गोडसे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

संपादकीय

# विवाहपूर्व समुपदेशन हवे

अलीकडे तरूण विवाहितांमध्ये अल्पावधीत बेबनाव निर्माण होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसते. क्षुल्लक भांडणांची परिणती टोकाच्या रागातून खुनापर्यंत जाते. एकंदरच सर्वसामान्य सुशिक्षित व्यक्तींकडून होणाऱ्या खुनासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढते आहे का यावर गंभीर चर्चा होण्याची गरज आहे. अशा बदलत्या मानवी प्रवृत्तीमागे काय कारणे आहेत याचे विश्लेषण झाल्यास ती रोखण्याबाबत उपाययोजना करता येऊ शकेल.

**उत्तर प्रदेशातील मेरठ येथील माजी मर्चंट नेव्ही अधिकाऱ्याचा पत्नीने खून केल्याच्या प्रकरणाने अलीकडेच देशभरात खळबळ माजवली. त्याच महिन्यात बंगळुरू येथे एका मराठी तरुणाने पत्नीला चाकूने वार करून संपवल्याचे शुक्रवारी समोर आले. यातही तरुण विवाहित दाम्पंत्यामधील टोकाचा बेबनाव दिसतो. मेरठमधील हत्याकांडात पत्नीने प्रियकराच्या मदतीने नियोजनपूर्वक पतीची हत्या केली. त्या प्रकरणातील पत्नी मुस्कान रस्तोगी व प्रियकर साहिल शुक्ला हे दोघेही ड्रग्जच्या आहारी गेलेले आहेत. २०१६ मध्ये सौरभ राजपूतशी प्रेमविवाह केल्यानंतर २०१९मध्ये मुस्कानला मुलगी झाली. त्याच वर्षी मुस्कानला वर्गमित्र साहिल भेटला व दोघांत प्रेमसंबंध निर्माण झाले. त्यानंतर चार-पाच वर्षांपूर्वी मुस्कान साहिलसोबत पळून गेली होती. परंतु घरच्यांनी पुन्हा सौरभ व मुस्कानला एकत्र राहण्यास समजावले. सौरभ नोकरीनिमित्त लंडनला गेल्यानंतर मुस्कान व साहिल यांच्यातील जवळीक वाढून अखेर परिणती दोघांनी सौरभचा खून करण्यात झाली. मुस्कानने खुनाचा कट रचल्याचे व साहिलने खुनात मदत केल्याचे समोर आले आहे. याउलट बंगळुरूमधील दाम्पत्यात पत्नीचा खून रागाच्या भरात घडला असावा असे प्रथमदर्शनी दिसते. बंगळुरूमधील तरुण जोडपे हे मूळचे महाराष्ट्रातील मुंबईतील असून पती राकेश खेडकरच्या नोकरीनिमित्ताने महिनाभरापूर्वीच ते बंगळुरू येथे राहावयास गेले होते. तिला नोकरी मिळत नसल्याने हे जोडपे आर्थिक ताणातून जात होते व त्यातून दोघांमध्ये भांडणे होत होती असे दिसते. पत्नी गौरी ही राकेश खेडकर याच्या सख्ख्या आत्याची मुलगी होती. दोघांचे एकमेकांवर प्रेम होते, परंतु दोघांच्याही कुटुंबांकडून नात्यात लग्न करण्याला विरोध होता. दोघेही एकमेकांशीच लग्न करण्यावर ठाम राहिल्याने दोनच वर्षांपूर्वी घरच्यांच्या मंजुरीनंतर त्यांचा विवाह झाला होता. या प्रेमकहाणीचा इतक्या अल्प काळात असा शेवट झाला. गौरी सुरूवातीपासून मानसिक रुग्णासारखी वागायची असा दावा आता राकेशच्या वडिलांनी केला आहे व तिने आई व भावाशी गैरवर्तन केल्याचे तपशील त्यांनी दिले आहेत. हे दावे कितपत खरे आहेत हे तपासात उघड होईलच, परंतु प्रथमदर्शनी ती आर्थिक ताण व टोकाचा राग याची बळी ठरल्याचे दिसते. राकेश बंगळुरू येथील सॉफ्टवेअर कंपनीत प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून काम करत होता. मास मीडियातील ग्रॅज्युएट असलेली गौरी बंगळुरूत आल्यानंतर नोकरी शोधत होती. परंतु नोकरी मिळत नसल्याने दोघांमध्ये वारंवार खटके उडत होते असे कळते. गौरीच्या खुनानंतर मृतदेह सुटकेसमध्ये ठेवून राकेशने सुटकेस कारमध्ये ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु नंतर सुटकेस घरात सोडून तो कारने मुंबई व मुंबईहून साताऱ्यातील शिरवळ येथे गेला. तिथे त्याने विषप्राशन केले. तेथे तो बेशुद्धावस्थेत आढळून आल्यानंतर पोलिसांनी त्याला पुण्यात आणून ससून रुग्णालयात उपचार सुरू केले. डिस्चार्जनंतर पोलिस त्याला ताब्यात घेतील. दोन्ही प्रकरणांत प्रेमविवाहाचा शेवट खुनात झाला आहे. एकंदरच तरुणांचे विवाहपूर्व समुपदेशन करण्याची गरज अशा प्रकरणांतून अधोरेखित होते.**

# सायबर गुन्हेगारी आणि त्यावरील उपाय

बऱ्याच दिवसांपासून आपल्या मोबाईलवर फोन डायल केल्यावर रिंग टोन वाजते की आपल्याला बनावट ईडी, पोलीस यंत्रणेवरून कॉल्स येत असतील तर त्याला बळी पडू नका. म्हणजे काय तर हे चोरटे कुठल्याही थराला जाऊ शकतात.

सायबर गुन्हेगारांनी आपल्या मानसिकतेचा संपूर्ण अभ्यास केला आहे. त्यांना माहीत आहे आपले नागरिक हे लवकरच भाऊक होतात, लगेच विश्वास ठेवतात. त्यांना भावनिक ब्लॅकमेल केले की ते लगेच त्यांच्या जाळ्यात अडकतात. आता इथे थोडे आपल्याला लगेच विश्वास ठेवून चालणार नाही, तर आपण लगेच सतर्क झाले पाहिजे.

या मोफत अफूच्या गोळीवर आपण नियंत्रण ठेवले पाहिजे. आपल्याला मोफत म्हटले की तोंडाला लगेच पाणी सुटते आणि या मोफतच्या जाळ्यात आपण लगेच अडकतो. मग आपली सायबर शिकार होते. या जगात मोफत काही मिळत नाही यावर आपण ठाम असले पाहिजे.

सायबर गुन्हेगार बँकेतून बोलतो असे बिनधास सांगतात. काही माहिती मागतात जसे खाते क्रमांक, नाव वैगेरे. खूप घाई दाखवतात. खाते बंद होईल असे सांगतात. तेव्हा आपण थोडा विचार केला पाहिजे की, बँकेला काय गरज आपल्या बँक डिटेल्सची? ते तर बँकेला माहीतच असतात. त्यामुळे कोणालाही बँक डिटेल्स देऊ नका. खाते बंद होत असेल तर सरळ सांगा बँकेत भेट देतो म्हणून आणि त्याउपरही पिच्छा सोडत नसतील तर बिनधास्त सांगा होऊ द्या बंद. नंतर बँकेत भेट देतो असे सांगा.



सर्वात महत्त्वाचे म्हणजे कसलाही ओटीपी कोणालाही देऊ नका किंवा सांगू नका. ओटीपी हा आपल्या तिजोरीची चावी असते. आपण एकदा का ओटीपी दिला की त्याच्या हाती आपण तिजोरीची चावी दिली असे समजा.

दुसरे महत्वाचे म्हणजे पोलीस, सीबीआय, इन्कम टॅक्स, ईडी या धमकीला अजिबात घाबरू नका. थोडा विचार करा आपण काही केले नाही आणि काही घडले नसेल तर घाबरण्याचे काही कारण नाही. लगेच तिथे भेट देतो म्हणून सांगा.

कुठलीही लिंक आली असेल तर ती ओपन करू नका. ही लिंक ओपन केल्यास आपण जाळ्यात अडकतो व आपले डिटेल्स त्यांच्यापर्यंत पोहचतात. कुणालाही अगदी क्षुल्लक रक्कम, फी, प्रवेश शुल्क पाठवू नका. ही राशी पाठविली की आपले बँक डिटेल्स चोरट्यांकडे पोहचतात.

हल्ली सायबर गुन्हे वाढले आहेत. त्यावर आपण काळजी घेणार तर आहोच, परंतु हेही लक्षात घेतले पाहिजे की, आपण खूप लालची आहोत ही माणसाची मानसिकता चोरट्यांनी ओळखली आहे. अधिक मिळेल या लालचीपणाला माणूस बळी पडतो. माणसाला सगळे फुकट पाहिजे असते. फुकटच्या मागे पळता पळता तो आपले हक्काचेसुद्धा गमावून बसतो.

चोर, भामटे, दरोडेखोर हे अगोदर ही होते, आजही आहेत व भविष्यातसुद्धा राहणार आहेत. फक्त आता चोरी व दरोडा पडण्याचे प्रकार बदलले आहेत. अगोदर घरफोडी व्हायची आता एवढी मेहनत व जोखीम घेण्याची चोरट्यांना गरज नाही. तेसुद्धा स्मार्ट झालेले आहेत. हे माझे नाही व हे मी घेतले नाही पाहिजे हा विचार जोपर्यंत रूजत नाही तोपर्यंत हे असेच चालणारच. ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

मुळात चोर चोरी का करतात हे शोधले पाहिजे. लोकसंख्या भरमसाठपणे वाढत आहे. त्या तुलनेत रोजगार कमी पडतात. अशा परिस्थितीत काही जण अशा गोष्टींकडे वळतात, कारण हा मार्ग सोपा आहे. या प्रकारात तर काही गुन्हेगार शेवटपर्यंत सापडत नाहीत. ते तपास यंत्रणेलासुद्धा आव्हान असते.

असे म्हटले जात होते की, संगणकीकरण हा सर्वात आर्थिक सुरक्षिततेचा मार्ग आहे, पण सायबर गुन्हेगारांनी यावरसुद्धा जोरदार हमला केला आहे. या सर्वावर एकच मार्ग आहे की, कोणावरही विश्वास ठेवू नका, ओटीपी पासवर्ड, एटीएम कार्ड अनोळखी व्यक्तीला देऊ नका. सतर्कता बाळगा. नक्कीच आपण सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणू शकू. जरी काही गडबड झाली तर कुठलीही लाज न बाळगता ताबोडतोब सायबर यंत्रणेला कळवा, म्हणजे ते लवकर कार्यवाही करू शकतील.

**–अरविंद मोरे, नवीन पनवेल**

# चौलमधील ताडगोळ्यांना उन्हाळ्यात मिळतेय खास पसंती

चौलमधील ताडगोळे पर्यटकांची खास पसंती असून ऐन उन्हाळ्यात मोठी मागणी असते. चौल परिसरात ताडाची असंख्य झाडे असून ताडगोळे विक्रीतून मोठे उत्पन्न स्थानिक साधतात.

उन्हाळ्याच्या दिवसात ताडगोळे थंडावा म्हणून पसंतीचे असतात. त्यामुळेच मुंबई, पुणे, ठाणे आदी शहरातून तसेच परिसरातून आलेले पर्यटक तसेच स्थानिकवर्ग ताडगोळे खरेदी करत असल्याचे चित्र रेवदंडा–चौल बाजारपेठेत दिसते. चौलमध्ये नारळी पोफळीच्या बागेसह ताडाची झाडेसुद्धा विपूल असून त्याला येणाऱ्या नारळासारख्या फळांना ताडगोळे म्हणतात. या फळांतला गर पाणीदार व चवदार असून उंच उंच ताडाच्या झाडावर चढून काढण्याचा व फळांतील गर काढण्यास कस लागतो.

ताडगोळ्यांना बाजारात चांगली मागणी असते. उन्हाळ्याच्या दिवसात अंगाची लाही लाही होत असताना नैसर्गिक थंडावा देणारे ताडगोळे शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून धरतात. अंगातील उष्णता कमी करणाऱ्या ताडगोळ्यांचे आयुर्वेदातही अनेक औषधी उपयोग सांगितले आहेत. ताडगोळे हे फळ ठराविक ऋतूमध्ये म्हणजे उन्हाळ्यात उपलब्ध असणारे फळ आहे. याची चव काहीशी शहाळ्यातील मलईसारखी असून चवीला ते मधूर असते. इंग्रजी भाषेत 'आईस ॲपल' म्हणून ओळखले जाणारे हे फळ आरोग्याच्या दृष्टीने गुणकारी असल्याचे म्हटले जाते.



या फळाच्या सेवनाने शरीराला आवश्यक असलेले क्षार व इतर पोषक तत्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर पुरळ, मुरूमं येत असतील त्याच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोग प्रतिरोधी तत्वे असून विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले जाते. या फळामध्ये अँथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे मिळविण्यासाठी त्याचे भरपूर सेवन करावे. वाढत्या उकाड्यात सध्या सारेच हैराण झाले असतात. घशाला पडणाऱ्या कोरडावर उपाय म्हणून बाजारातील शीतपेय किंवा बर्फाचे गोळ्यांवर ताव मारतात, परंतु कुत्रिम थंडाव्यापेक्षा ताडगोळ्यांसारखा नैसर्गिक उपाय केव्हाही आरोग्यासाठी चांगलाच परिणामकारक ठरतो. ज्यांना वजन घटवायचे असेल त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे तसेच रसामुळे भूक शमविण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरच्या संबंधित काही विकार असतील त्यांच्यासाठी ताडगोळ्यांचे सेवन उपयुक्त आहे. या फळात पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनाने शरीराला श्रम करण्याची आवश्यक ताकद व उर्जा मिळते. शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्याने दिवसभरासाठी लागणारी ताकद या फळातून मिळत असते.

अशा या गुणकारी ताडगोळे फळांची फार मोठी मागणी उन्हाळ्यात पर्यटक व स्थानिकवर्ग करत असतो. चौल परिसरात आर्थिक उत्पन्न देणारे ताडवृक्ष मोठ्या संख्येने असून या वृक्षाची लागवड करणे गरजेचे आहे.

**–महेंद्र खैरे, रेवदंडा**



## बदलते तंत्रज्ञान

# रेशन कार्ड ई-केवायसी करण्याची सोपी पद्धत

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्याचा लाभ घेणाऱ्या रेशनकार्डधारकांसाठी ई–केवायसी करणे शासनाने अनिवार्य केले आहे. यासाठी ३१ मार्चपर्यंत अंतिम मुदत आहे. लाभार्थ्यांना रेशन दुकानाबरोबरच घरबसल्या मोबाईलवरूनही ई–केवायसी करता येते.



देशात रेशन कार्डद्वारे मोफत धान्याचे वाटप करण्यात येते. आता हे वाटप ऑनलाईन केले जाते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत, रेशन कार्डचे ई–केवायसी करणे आवश्यक आहे.

या आधी २०१३मध्ये देशातील कार्डधारकांनी रेशन कार्डचे ई–केवायसी केले होते. २०१३पासून १० वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. नियमानुसार दर पाच वर्षांनी ई–केवायसी आवश्यक आहे. या डिजिटल युगात, तुम्ही घरी बसून तुमचे ई–केवायसी सहजपणे करू शकता.

ई–केवायसीसाठी तुम्हाला सरकारी कार्यालयात जाण्याची गरज नाही. सर्वात आधी तुम्हाला केवायसी आणि आधार फेसआरडी डाउनलोड करावे लागेल. यानंतर ॲप उघडा आणि लोकेशन एंटर करा.

यानंतर तुम्हाला आधार क्रमांक, कॅप्चा आणि मिळालेला ओटीपी टाकावा लागेल. त्यानंतर सर्व माहिती स्क्रीनवर दिसेल. त्यानंतर फेस–ई–केवायसी पर्याय निवडा. कॅमेरा चालू होईल, फोटोवर क्लिक करा आणि तो सबमिट करा. शेवटी तुमचे ई–केवायसी पूर्ण होईल.

अनेक कार्डधारकांनी त्यांचे ई–केवायसी आधीच केले असेल, पण त्यांचे ई–केवायसी झाले आहे की नाही याबद्दल गोंधळ होऊ शकतो. तुम्ही खाली दिलेल्या स्टेप्स वापरून ई–केवायसी स्थिती तपासू शकता.

आधी तुम्हाला My KYC ॲप उघडावे लागेल. त्यानंतर ठिकाण टाकावे लागेल. त्यानंतर आधार क्रमांक, कॅप्चा आणि ओटीपी एंटर करा. जर तुमचे केवायसी झाले असेल, तर तुम्हाला स्टेटसमध्ये Y लिहिलेले दिसेल.

याशिवाय तुम्ही रेशन कार्डचे ई–केवायसी ऑफलाइन देखील करू शकता. जर तुमचे मोबाईल ॲप काम करत नसेल तर घाबरून जाण्याची गरज नाही. तुम्ही जवळच्या रेशन दुकानातून ई–केवायसी करू शकता. यासाठी तुम्हाला रेशन दुकानात जावे लागेल. अंगठ्याचा किंवा बोटाचा ठसा घेऊन पडताळणी केली जाईल. त्यानंतर तुमचे ई–केवायसी होईल.

# ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोतापल्ले

निमित्त

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक अशी डॉ. नागनाथ लालूजीराव कोतापल्ले यांची ओळख राहिली आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २९ मार्च १९४८ रोजी मुखेड (जि. नांदेड) येथे त्यांचा जन्म झाला होता.



नागनाथ कोतापल्ले यांचे महाविद्यालयीन शिक्षण देगलूर येथे झाले. बीए आणि एमए या दोन्ही परीक्षांत मराठवाडा विद्यापीठात ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. ते कुलपतींच्या सुवर्णपदकाने सन्मानित झाले होते. 'शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध लिहून त्यांनी १९८० साली पीएचडी पदवी संपादन केली. बीड येथील महाविद्यालयात १९७१ ते १९७७ या काळात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून काम केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये त्यांनी अधिव्याख्याता आणि प्रपाठक या पदांवर १९७७ ते १९९६ या काळात काम केले.

यानंतर नागनाथ कोतापल्ले हे पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५पासून २०१०पर्यंत कोतापल्ले मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. व्यासंगी, अध्यापनकुशल, उपक्रमशील आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी लौकिक मिळवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक आणि पुणे विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे समन्वयक या पदांवरून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

नागनाथ कोतापल्ले यांनी राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बालपुरस्कार समिती आणि एसएससी बोर्डाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणूनदेखील काम केले आहे. कोतापल्ले हे १९८८ ते ९५ या काळात मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह, १९९५ ते ९६मध्ये साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष आणि साहित्य संस्कृती मंडळाच्या मराठी वाङ्मयकोशाचे समन्वय संपादक होते. 'प्रतिष्ठान' या नियतकालिकाचे संपादक म्हणूनही त्यांनी काम केले आहे, तर राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते.

श्रीगोंदा येथे १९९९ साली झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आणि २००५ साली जालना येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे कोतापल्ले अध्यक्ष होते. चिपळूण येथे २०१२ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

कोतापल्ले यांनी विपूल लेखन केलेले आहे. मूड्स (कवितासंग्रह), कर्फ्यू आणि इतर कथा, रक्त आणि पाऊस, संदर्भ, कवीची गोष्ट, सावित्रीचा निर्णय, देवाचे डोळे (कथासंग्रह), राजधानी (दीर्घकथा संग्रह), मध्यरात्र, गांधारीचे डोळे, प्रभाव (कादंबरी), पापुद्रे, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध, नवकथाकार शंकर पाटील, साहित्याचा अन्वयार्थ, मराठी कविता : एक दृष्टिक्षेप, साहित्याचा अवकाश (समीक्षात्मक), गावात फुले चांदणे (प्रौढ नवसाक्षरांसाठी लघुकादंबरी), मराठी साहित्य संमेलने आणि सांस्कृतिक संघर्ष, उद्याच्या सुंदर दिवसासाठी (ललित गद्य), जोतीपर्व (अनुवादित पुस्तक) स्त्री–पुरुष तुलना, शेतकऱ्यांचा आसूड, पाचोळा आणि दहा समीक्षक, निवडक बी रघुनाथ (संपादन) असे त्यांचे साहित्य आहे. (साभार : इंटरनेट)


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# डायबिटीस असेल तर आंबा खावा की नको?

उन्हाळा सुरु झाला की, बाजारात सर्वत्र आंबे पाहायला मिळतात. आपल्यापैकी क्वचितच असा कोणी असेल ज्याला आंबा खायला आवडत नाही.हे फळ चवीला अगदी गोड आणि रसाळ असते. त्याच्या सुगंधामुळे खाण्याची इच्छा अधिक तीव्र होत जाते. याच्या गोड चवीमुळे मधुमेहाचे रुग्ण आंबा खाऊ शकतात का असा प्रश्न पडतो.



आंबा हा अनेक पोषक तत्वांनी भरलेले फळ आहे. यामध्ये कार्बोहायड्रेट्स, प्रथिने, अमीनो आम्ल, लिपिड्स आणि फायबर असतात. आंब्याच्या फळात कोलेस्टेरॉल नसते तसेच कॅल्शियम, फॉस्फरस, लोह आणि जीवनसत्त्वे अ आणि यांचा भरपूर प्रमाणात समावेश असतो. १०० ग्रॅम आंबा खाल्ल्याने ६० ते ९० कॅलरीज मिळतात. यामध्ये ७५ ते ८५ टक्के पाणी असते.

आंब्यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त आणि चरबीचे प्रमाण कमी असते. याशिवाय हृदयरोग आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारापासून आपले रक्षण करते. आपण योग्य प्रमाणात आंबा खाल्ला तर त्यात असलेले फायबर पचन सुधारते. परंतु, मधुमेहाच्या रुग्णांनी आंबा कमी प्रमाणात खावा. आंब्याचा ग्लायसेमिक इंडेक्स हा ५१ आहे. फळांचा गोडवा यात असल्यामुळे फ्रुक्टोज आढळते. यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. आंबा हा बटाटे, कडधान्य,तळलेले पदार्थ आणि उच्च कार्बयुक्त पदार्थांसोबत खाणे टाळायला हवे.

ग्लायसेमिक इंडेक्सनुसार अननस, टरबूज, बटाटे आणि ब्रेड यांचा ग्लायसेमिक इंडेक्स हा ७० पेक्षा जास्त असतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. डॉक्टर सांगतात की, ज्याच्या शरीरात रक्तातील साखरेचे प्रमाण अनियमित आहे, पोटॅशियमचे प्रमाण जास्त आहे अशा लोकांनी आंबा खाणे टाळावे.

डॉक्टर म्हणतात की, सकाळी फिरायला जाताना, व्यायाम केल्यानंतर आणि जेवणाच्या आधी फळे खाणे चांगले असते. जेवणासोबत आंब्याचे सॅलड देखील आपण खाऊ शकतो. जेवणाच्या वेळी आंबा खाणे चांगले कारण यावेळी रक्तातील साखरेची पातळी जास्त वाढत नाही. जेवणानंतर आंबा कधीही खाऊ नये. त्यामुळे रक्तातील साखर वाढते.

# मालमत्ता कर थकबाकीदारांची यादी

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जिल्हा रायगड, पनवेल - ४१०२०६

## जाहीर सूचना

## मालमत्ता कर विभाग

**महानगरपालिका हद्दीतील उपयोग औद्योगिक/कमर्शियल असलेल्या थकबाकीदारांची यादी दिनांक 18 मार्च 2025 अखेर**


### औद्योगिक/कमर्शियल मालमत्ता कर थकबाकीदारांची यादी

| अनु क्र. | मालमत्ता क्र. | कर धारकाचे नाव | पत्ता | शिल्लक मागणी रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | TLE1-399 | ग्रोवेल मरकन्टटाईल प्रा. लि. | ग्रो वेल मर्कनटाइल प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र. 12,इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 25572643 |
| 2 | TLE1-270 | धारक | प्लॉट क्र. P15, P14, P13, P12,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 10390996 |
| 3 | TLE2-135 | ग्लास टेक. इंडस्ट्रीज | ग्लास टेक इंडस्ट्रीज इंडिया प्रा.ली., प्लॉट क्र. L-115, L-114, L-113, L-112,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 7507118 |
| 4 | TLE1-11 | धारक सहारा इंडिया | सहारा इंडिया,प्लॉट क्र. A-3,सेक्टर क्र. 1 तळोजा औद्योगिक क्षेत्र एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 6884863 |
| 5 | TLE3-8 | प्रेस्टिज फूड्स | प्रेस्टीज फूड्स,प्लॉट क्र. M-18,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 5374536 |
| 6 | TLE2-9 | निप्पान ट्रान्सवाटर प्रा. लि. | निप्पान ट्रान्सकोअर प्रा ली ,प्लॉट क्र. L-9,अँडीशनल इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 5290828 |
| 7 | TLE4-498 | ड्युकल ऑरगॅनिक | ड्यूकल ऑर्गानिक कलर्स प्रा लि ,प्लॉट क्र. 22/2,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 5262610 |
| 8 | TLE4-339 | रिलायबल एक्स्ट्राकशन | रिलायबल एक्स्ट्राकशन,प्लॉट क्र. G-18,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 5245374 |
| 9 | TLE4-460 | लेन्सटेक ऑप्टीकल प्रा.लि. | लेन्सटेक ऑप्टिकल प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र. 17/3,केमिकल झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 5221241 |
| 10 | TLE1-262 | हेल्थ सेक्युअर (इंडिया) प्रा. लि. | हेल्थ सेक्युअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र. C-10,इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 5214210 |
| 11 | TLE3-24 | गोशीया कोल्ड स्टोरेज | गॉशिया कोल्ड स्टोरेज प्रा. लि., प्लॉट क्र. M-7,फुड प्रोसेसिंग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 5066749 |
| 12 | TLE1-231 | धारक वेस्टर्न इंडिया ग्लास वर्क्स लिमिटेड | वेस्टर्न इंडिया ग्लास वर्क्स लिमिटेड,प्लॉट क्र. 11/C5, C22,इंजिनिअरींग झोन,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 5024553 |
| 13 | TLE2-253 | धारक-प्रिस्टो पाइप अँड फिटिंग | प्रिस्टो पाइप अँड फिटिंग,प्लॉट क्र., अँडीशनल इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4900218 |
| 14 | TLE1-255 | अक्षता मर्कंटाईल प्रा. लि. | अक्षता मेरकांटील प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र. C-9/2,इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4881935 |
| 15 | TLE1-400 | धारक श्रीवास्तव | एम एस इ बी ,प्लॉट क्र. AM-18,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4876073 |
| 16 | TLE4-478 | टेक्नोवा इमेजिंग सिस्टीम्स | टेक्नोवा इमेजिंग सिस्टीम,प्लॉट क्र. 17/1,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4803594 |
| 17 | TLE1-401 | हिंडाल्को इंडस्ट्रीज लि. | हिंडाल्को इंडस्ट्रीज लिमिटेड,प्लॉट क्र. 2A,2B,इंजिनिअरींग झोन,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4778319 |
| 18 | TLE1-12 | धारक ओशन ग्लोब कंटेनर्स सर्विसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड | ओशियनग्लोब कंटेनर सर्विसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र. A-4, इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4776032 |
| 19 | TLE4-484 | सोनेका केमिकल्स | सोनेका केमिकल,प्लॉट क्र. 14,सेक्टर क्र. 4 तळोजा औद्योगिक क्षेत्र (M.I.D.C.) नोड, पनवेल | 4732280 |
| 20 | TLE4-431 | अजिंक्य केमिकल | अजिंक्य केमिकल,प्लॉट क्र. G-7, केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4663919 |
| 21 | TLE4-13 | धारक व्ही व्ही एल फार्मा प्रा ली | धारक व्ही व्ही एल फार्मा प्रा ली,प्लॉट क्र. W-230G,केमिकल झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4538729 |
| 22 | TLE4-441 | धारक महारूक सी फूड प्रायव्हेट लिमिटेड | महारूक सी फूड प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र. 17/36,केमिकल झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4538701 |
| 23 | TLE4-261 | धारक नॅमको कार्पोरेशन ली | नॅमको कार्पोरेशन ली,प्लॉट क्र. J-18, केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4491617 |
| 24 | TLE1-397 | तुरखीया स्टील प्रा. लि. | तुराखिया स्टील प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र. E-5,इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4420761 |
| 25 | TLE2-225 | धारक दयानंद राजदेव गुप्ता | प्लॉट क्र., अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4381296 |
| 26 | TLE1-249 | नायका स्टील | नायका स्टील,प्लॉट क्र. C-17/6,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4374208 |
| 27 | TLE3-2 | गंधार आईल रिफायनरी इंडिया लि. | गंधार ऑईल रिफायनरी इं. लि., प्लॉट क्र. T-9, T-10,फुड प्रोसेसिंग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4369179 |
| 28 | TLE2-177 | मे. घुरा इंडस्ट्रीज प्रा. लि. प्लॉट न. व्ही-22 | घुरा इंडस्ट्रीज प्रा.लि., प्लॉट क्र. V-22,अँडीशनल इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4312949 |
| 29 | KLS1-883 | धारक- जि. के. ग्रुप | जि. के.ग्रुप,प्लॉट क्र. 859,कळंबोली स्टील मार्केट यार्ड, कळंबोली, पनवेल. 410218 | 4311781 |
| 30 | TLE4-433 | धारक बुशरा फूड प्रायव्हेट लिमिटेड | बुशरा फूड प्रायव्हेट लिमिटेड,प्लॉट क्र. G-4,G-3,सेक्टर क्र. 4 तळोजा औद्योगिक क्षेत्र एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4284707 |
| 31 | KM2-31 | सुविधा कोल्ड स्टोरेज | सुविधा कॉल्ड स्टोरेज,प्लॉट क्र. 209, 202,,जवाहर इंडस्ट्रीज, कामोठे, पनवेल. 410209 | 4273976 |
| 32 | TLE1-282 | धारक मोहम्मद कुरेशी फजल कुरेशी | मिता इंजिनिअर्स,प्लॉट क्र. D-24,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4181861 |
| 33 | TLE3-56 | धारक | प्लॉट क्र. M-50/1,फुड प्रोसेसिंग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4161883 |
| 34 | PMCOP99- 475 | धारक - सिमरन मोटर्स प्रा. ली. (कार शेड) | प्लॉट नं. 102, इंडस्ट्रियल एरिया, जुने पुणे मुंबई हायवे जवळ, पनवेल 410206. | 4102790 |
| 35 | TLE1-373 | के. जी. स्टील कॉर्पोरेशन | लोहा इस्पात लिमिटेड,प्लॉट क्र. E-19,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4088350 |
| 36 | TLE2-207 | मे,दिव्याश्री पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्लॉट नं. टी- 3/1/1 | दिव्याश्री पॅकेजिंग इंडस्ट्री,प्लॉट क्र. T-3-1/1,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 4019420 |
| 37 | TLE4-217 | आकाश प्यूरोकेम | आकाश प्युरोकेम प्रा लि ,प्लॉट क्र. W-67,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3988566 |
| 38 | TLE3-55 | लिब्रान कोल्ड स्टोरेज | लिब्रान कोल्ड स्टोरेज प्रा. लि., प्लॉट क्र. M-50,फुड प्रोसेसिंग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3927618 |
| 39 | TLE1-359 | मनोहर ब्रदर्स | पावर कॅब कपशिटर्स प्रा लि., प्लॉट क्र. D-17,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3893696 |
| 40 | TLE2-99 | चांडोक ऑटोमोटिव्ह मॅन्यू. | चांडोक ऑटोमोटिव्ह मॅन्यूफॅक्चर्स,प्लॉट क्र. L-119,अँडीशनल इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3823357 |
| 41 | KLS2-218 | सी एम पी सी एस कंपाऊंड A/C अरोरा सुरजीत सिंग अनुप सिंग प्लॉट नं 1D बल्क लँड कळंबोली | प्लॉट क्र., कळंबोली स्टील मार्केट यार्ड, कळंबोली, पनवेल. 410218 | 3812639 |
| 42 | KLS2-210 | ए सी सी कंपनी | प्लॉट क्र., कळंबोली स्टील मार्केट यार्ड, कळंबोली, पनवेल. 410218 | 3801805 |
| 43 | TLE4-458 | मे बिशन स्टील इंडस्ट्रीजस | मे बिशन स्टील इंडस्ट्रीज,प्लॉट क्र. 17/5,केमिकल झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3800012 |
| 44 | TLE1-275 | अल्केम लॅबोरेटरीज | अल्केम लॅबोरेटरी प्रा. लिमिटेड,प्लॉट क्र. C -17/7 C6/1, C-6/2,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3793923 |
| 45 | KLS2-217 | सी एम पी सी एस कंपाऊंड A/C बंगा कर्नल सिंग बहादुर सिंग प्लॉट नं 1C बल्क लँड कळंबोली | प्लॉट क्र., कळंबोली स्टील मार्केट यार्ड, कळंबोली, पनवेल. 410218 | 3761132 |
| 46 | TLE1-147 | धारक ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड | ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड,प्लॉट क्र. B-25, B-26, B-27, इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3753977 |
| 47 | TLE1-221 | मालदार बॅरल्स | मलदार बॅरल्स प्रायव्हेट लिमीटेड,प्लॉट क्र. C-29,इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3709327 |
| 48 | TLE1-159 | पॉवरीका लि. | प्रि टेस प्रॉडक्टस,प्लॉट क्र. B8,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3709151 |
| 49 | TLE1-250 | टेको इंडस्ट्रीज | श्री रामदेव स्टील प्रायव्हेट लिमिटेड टेको इंडस्ट्रीज ,प्लॉट क्र. C-17/5,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3691178 |
| 50 | TLE1-212 | धारक यलाइड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड | यलाइड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड ,प्लॉट क्र. C-30,इंजिनिअरींग झोन, तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 3650755 |
| 51 | KL20-1- | धारक - सुअस्थ हॉस्पिटल | प्लॉट क्र. 2,सेक्टर क्र. 20,कळंबोली, पनवेल. 410218 | 52783916 |
| 52 | PMC9-V9Z2000872-106 | मेर्सस श्रीबाग सहकारी मध्यवर्ती ग्राहक मंडळ | 101, रायगड बाजार,प्लॉट क्र., सेक्टर क्र. 9 पनवेल नोड, पनवेल | 7396859 |
| 53 | KH3A-337-1 | शिरीष नारायण घरत,रामकृष्ण नारायण घरत | बेलपाडा, खारघर, पनवेल. 410210 | 4188484 |
| 54 | KLS1-17-147 | धारक- नरेंद्र बी केसरीया | 00, रिद्धी आरकेड को-ऑप हाऊसिंग सोसायटी,प्लॉट क्र. 857D, 857C, सेक्टर क्र. S1 कळंबोली, रोडपाली नोड, पनवेल | 3550330 |
| 55 | KH27-66- | धारक- श्री हझारिमल सोमाणी मेमोरियल ट्रस्ट | प्लॉट क्र. 92,सेक्टर क्र. 27, खारघर, पनवेल. 410210 | 3320465 |
| 56 | PMC12-V12Z1005052- 1 | मेर्सस मा. अध्यक्ष उरण पनवेल आगरी समाज मंडळ | F.PL.138, कन्या शाळा जवळ, पनवेल -410206 | 2923631 |
| 57 | TLE1-269- | द एक्झीकेटीव इन हॉटेल | हॉटेल एक्झिक्यूटिव्ह,प्लॉट क्र. P-16,इंजिनिअरींग झोन ,तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल. 410208 | 2880285 |
| 58 | TPDNG1- 200-1 | धारक- मुबारअल्लाह लालमहमद खान | धरणा कॅम्प गाव | 2577716 |
| 59 | KL5E-6- | धारक - सतीश मोहन पाटील | प्लॉट क्र. 5,सेक्टर क्र. 5E, डी.जी. तटकरे जुनियर कॉलेज रोड, कळंबोली, पनवेल. 410218 | 2508601 |
| 60 | TPDNG1- 419-2 | धारक- सायरस खुदाबक्ष इराणी | फ्लॅट/गाळा क्र. - 2, किरवली टोल प्लाझा जवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल. 410208 | 2467151 |
| 61 | TPDNG1- 241-1 | धारक- इरफान खान मोहम्मद खान | फ्लॅट/गाळा क्र. - 1, गावदेवी मंदिर रास्ता, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल. 410208 | 2419213 |
| 62 | TPRHG- 2307- | ईनामुल्लाह अनारुल्लाह खान | अहले हदीस मस्जिद जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 2417065 |
| 63 | KH2-21-10 | धारक- कमल मोहनदास हरजैनी,शर्मिला हरजैनी | फ्लॅट/गाळा क्र. - 9, लिटिल वर्ल्ड मॉल ,प्लॉट क्र. 21,सेक्टर क्र. 2 खारघर, पनवेल. 410210 | 1835927 |
| 64 | TPTDG- 490-408 | धारक- रिदम डेव्हलपर्स | R-43,बालाजी इंडस्ट्रीयल पार्क,प्लॉट क्र. P1 To P06,सेक्टर क्र. TDG तळोजा, तळोजा पाचनंद, नावडे नोड, पनवेल | 1722590 |
| 65 | KH7-12-73 | धारक- पटेल हेरिटेज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | 73,पटेल हेरिटेज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड,प्लॉट क्र. 15, 17,सेक्टर क्र. 7 खारघर नोड, पनवेल | 1708644 |
| 66 | KH8-27- | धारक- इतरधारक- मेहराज खान | प्लॉट क्र. 17,सेक्टर क्र. 8, खारघर, पनवेल. 410210 | 1602753 |
| 67 | TPRHG- 2273- | धारक - अहमदअली सामूउल्लाह खान | अकॉर्ड ग्रोपू फॅक्टरी जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1600534 |
| 68 | TPRHG- 2272- | धारक - दलीचंद कस्तुरचंद जैन | अकॉर्ड ग्रोपू फॅक्टरी जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1568450 |
| 69 | NPW4-69- | मे ऑडियोवर हॉटेल्स प्रा.लि.तर्फे संचालक सचिन कुमार शेट्टी, मे ऑडियोवर हॉटेल्स प्रा.लि.तर्फे संचालक संतोष रघु शेट्टी, मे ऑडियोवर हॉटेल्स प्रा.लि.तर्फे संचालक दामोदर सुंदर शेट्टी | प्लॉट क्र. A1/A2,सेक्टर क्र. 4,नविन पनवेल पश्चिम 410206 | 1561608 |
| 70 | TPRHG- 552- | शेर अली नजर अली खान | फडॉम्स केबिन्सरोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1552641 |
| 71 | KL14-1-2 | धारक - रामदेव इंटरप्राईजेस | 2,भूमी पिनॅकल,प्लॉट क्र. A24,सेक्टर क्र. 14 कळंबोली, रोडपाली नोड, पनवेल | 1526582 |
| 72 | NPE8-12-19 | धारक- नंदकुमार शंकर गायकवाड | Office-2,डॉक्टर हाउस,प्लॉट क्र. 105,106,सेक्टर क्र. 8 नविन पनवेल (पूर्व), मोठा खांदा, खांदा कॉलनी, आसूडगाव नोड, पनवेल | 1523234 |
| 73 | TPDNG- 522- | धारक-मोहम्मद अमीन दुखी शाह | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल. 410208 | 1518843 |
| 74 | NPE1S-89- | धारक - मे. शिल्पा बेवरेज प्रा. लि तर्फे डायरेक्टर मिथीलेश डी.राजपूत | प्लॉट क्र. 89,सेक्टर क्र. 1S,नविन पनवेल (पूर्व).410206 | 1509997 |
| 75 | KH2-21-58 | धारक-गायत्री होम्स | फ्लॅट/गाळा क्र. - 213B, लिटिल वर्ल्ड मॉल ,प्लॉट क्र. 21,सेक्टर क्र. 2 खारघर, पनवेल. 410210 | 1500984 |
| 76 | TPGHG- 982- | शिवाजी बाळाराम गोंधळी | राजस्थानी ढाबा जवळ, घोट गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1495258 |
| 77 | KL13-97- | धारक - सुदर्शन विला | प्लॉट क्र. 60,सेक्टर क्र. 13,कळंबोली, पनवेल. 410218 | 1485557 |
| 78 | NPE8- 12-20 | धारक- नंदकुमार शंकर गायकवाड | Office-4,डॉक्टर हाउस,प्लॉट क्र. 105,106,सेक्टर क्र. 8 नविन पनवेल (पूर्व), मोठा खांदा, खांदा कॉलनी, आसूडगाव नोड, पनवेल | 1476129 |
| 79 | KL23-99- | धारक - नारायण रावरिया | प्लॉट क्र. 118,सेक्टर क्र. 23,कळंबोली, पनवेल. 410218 | 1475952 |
| 80 | KLS1- 22-13 | धारक- हाजी अब्दूल वहाब खान | प्लॉट क्र. 856,कळंबोली स्टील मार्केट यार्ड, पनवेल. 410218 | 1474612 |
| 81 | TPRHG- 1394- | नारायण प्रसाद मालवणी, एच प एम फमिली ट्रस्ट | अगस् ग्रीनबिल्ड लप, लाइट वेट एक ब्लॉक मॅन्युफॅक्चरिंग यूनिट जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1460665 |
| 82 | TPRHG- 573- | धारक- स्वाती शरद म्हात्रे | फ्लामिंग इंडस्ट्रीस एलएलपी जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1459974 |
| 83 | KH13- 116-122 | धारक- दी पॅसिफिक अपार्टमेंट . .. | 500,दी पॅसिफिक अपार्टमेंट,प्लॉट क्र. 229,सेक्टर क्र. 13 खारघर नोड, पनवेल | 1454507 |
| 84 | KH7-2-4 | धारक- पार्थ अशोक छाजर | 2,नव पनवेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी,प्लॉट क्र. 2,सेक्टर क्र. 7 खारघर नोड, पनवेल | 1443554 |
| 85 | KH12-970- | धारक- बादल दोषी आणि पवन दोषी | प्लॉट क्र. F46-30/31,सेक्टर क्र. 12, खारघर, पनवेल. 410210 | 1430962 |
| 86 | TPRHG- 1918- | भगवती हिरालाल जैन/राकेश हिरालाल जैन | अहले हदीस मस्जिद जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1428038 |
| 87 | TPPLG- 758- | धारक- आब्बू खुरेशी | पालेखुर्द | 1410041 |
| 88 | TPRHG- 2306- | शफिक अहमद जुबेर अहमद खान | अहले हदीस मस्जिद जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1409381 |
| 89 | KL23-49- | धारक - कल्याण सर | प्लॉट क्र. 60,सेक्टर क्र. 23,कळंबोली, पनवेल. 410218 | 1407518 |
| 90 | KH13A- 248- | गजानन सुदाम पाटील | खारघर ,खारघर नोड,पनवेल | 1404066 |
| 91 | KM23-212- | धारक - दुर्गा विश्वास पावनेकर व रेश्मा पंडित पावणेकर | नौपाडागाव,कामोठे, पनवेल. 410209 | 1401965 |
| 92 | NPE11- 92-124 | धारक-मोनिका राकेश गुप्ता | शुभम कॉम्प्लेन्स,प्लॉट क्र. 1,3,सेक्टर क्र. 11 नविन पनवेल (पूर्व), मोठा खांदा, खांदा कॉलनी, आसूडगाव नोड, पनवेल | 1378644 |
| 93 | KM23-248- | धारक विठोबा गणपत म्हात्रे | नौपाडागाव,कामोठे, पनवेल. 410209 | 1375669 |
| 94 | KL23-52- | धारक - जगताप सर | प्लॉट क्र. 64, 65,सेक्टर क्र. 23,कळंबोली, पनवेल. 410218 | 1369278 |
| 95 | TLE4- 332-13 | धारक- सिल्वर स्प्रिंग .. | A13,धारक सिल्वर स्प्रिंग,प्लॉट क्र. 6,सेक्टर क्र. 4 तळोजा औद्योगिक क्षेत्र (M.I.D.C.) नोड, पनवेल | 1360280 |
| 96 | TPRHG- 1258- | वशी अहमद जब्बार शेख. | फ्लॅट/गाळा क्र. - 41/2, अंबे माता मंदिर जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1353331 |
| 97 | TPDNG- 504- | धारक- संतोष महादेव वाघ | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल. 410208 | 1346226 |
| 98 | TPRHG- 2182- | हरिष पोशा पाटील | रोहिंजन गाव, तळोजा नोड, पनवेल | 1333670 |
| 99 | KL23-101- | धारक - रवी सर | प्लॉट क्र. 121, 122,सेक्टर क्र. 23,कळंबोली, पनवेल. 410218 | 1299860 |
| 100 | TPRHG- 2301- | धारक - अबरार अहमद खान, इजहरुल हक्क खान | अहले हदीस मस्जिद जवळ रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल. 410208 | 1276057 |

दिनांक 18/03/2025 पर्यंतची प्रसिध्द केलेल्या औद्योगिक/कमर्शियल मालमत्ता धारकांनी थकबाकीसह कर व इतर दंड सदर जाहीर सुचना प्रसिध्दीच्या दिनांकापासून 5 दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे. जे थकबाकीदार विहीत मुदतीत मालमत्ता कराचा भरणा करणार नाहीत त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान 8 नियम 42 ते 47 अन्वये वॉरंट (अधिपत्र) काढून संबंधितांच्या स्थावर मालमत्ता अटकावणी करुन ती जाहिर लिलावाव्दारे लिलाव करुन वसुल करणेत येईल. तसेच, नोटीस फी, वॉरंट फी, पेपर नोटीस फी इत्यादी थकीत मालमत्ता धारकाच्या बिलामध्ये समाविष्ट करुन वसुल करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच, इतर मालमत्तांचा लिलाव करणेत येईल याची मालमत्ता धारकांनी नोंद घ्यावी. तसेच, मालमत्ता कर भरणा केला असल्यास त्याची पावती मालमत्ता कर विभाग /प्रभाग कार्यालयात सादर करावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५
प्र.क्र.१३५/१३५/२०२५
दिनांक :२८/०३/२०२५

**सही/-**
**उपायुक्त (कर)**
**पनवेल महानगरपालिका**



# नवी मुंबईत कर वसुलीची धडक मोहीम

## मालमत्ताकराची ६०० कोटी रुपयांची वसुली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मालमत्ताकर हा नवी मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. मालमत्ताकर विभागाने कर वसुलीची धडक मोहीम राबवून अद्यापपर्यंत ६०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम वसूल केली आहे, अशी माहिती उपायुक्त शरद पवार यांनी दिली.

मालमत्ता कर, नगररचना कर, पाणीपट्टी, एलबीटीच्या ऐवजी शासनाकडून मिळणारे अनुदान आदी कर हे महापालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोतआहेत. मालमत्ता कर वसुलीसाठी जानेवारी महिन्यापासून विशेष मोहीम घेण्यात आली. यामध्ये मोठे थकबाकीदार असलेल्या मालमत्ताकरधारकांना नोटीसा बजावणे. या नोटीसी नंतरही त्यांनी मालमत्ताकर न भरल्यास पुढे त्यांची नळ



जोडणी खंडित करणे, मालमत्ता अटकावणी करणे आदी प्रकारे प्रभावीपणे कारवाया करून मालमत्ताकर वसुलीकरिता प्रयत्न केले जात आहेत. त्यानुसार आतापर्यंत ४५४हून अधिक मालमत्ताकरधारकांच्या मालमत्ता अटकावणी करण्यात आल्या. त्यांच्याकडून ४० कोटी रुपये अपेक्षित होते. त्यापैकी आतापर्यंत १७ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता कर विभागाला ९०० कोटी रुपये वसूल करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी अद्यापपर्यंत ६०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम वसूल करण्यात मालमत्ताकर विभागाला यश आले आहे. २०२५ - २६ या आर्थिक वर्षाकरिता १ हजार २०० कोटी रुपये वसुलीचे उद्दिष्ट आहे. एक लाख रुपयांहून अधिक रक्कमेचे थकबाकीदार असलेले एक हजाराहून अधिक मालमत्ताधारक आहेत. महापालिका क्षेत्रात एकूण तीन लाख ४५ हजार मालमत्ता आहेत. यामध्ये रहिवाशी वापर असलेल्या दोन लाख ६८ हजार, ५२ हजार वाणिज्य आणि उर्वरित औद्योगिक मालमत्ता आहेत.

वाशी येथे विविध राज्यांची भवन आहेत. यातील काही राज्याच्या भावनांकडून अनेक वर्ष आता कर मिळत नव्हता. त्यामुळे त्यांची थकबाकी वाढली होती. यावर्षी कर निरीक्षक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सातत्याने या राज्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत कर भरण्याकरिता पाठपुरावा केला. त्यामुळे गोवा, पंजाब, ओडिसा,

मध्य प्रदेश या राज्य सरकारच्या माध्यमातून सुमारे २० कोटी रुपयांहून अधिक रकमेचा कर वसूल झाला आहे. त्याचप्रमाणे नुकत्याच झालेल्या लोकअदालत मध्ये १३९ जणांनी दोन कोटी ७५ लाख रुपयांचा कर भरला आहे. एक हजार ६८५ थकबाकीदारांना लोकअदालतीच्या नोटीसा बजावल्या होत्या. प्रशासनाला या थकबाकीदारांकडून ४१ कोटी रुपये येणे अपेक्षित होते.

# गुढीपाडवा आणि रमजान सणात चोख बंदोबस्त -वपोनि नाईकवडे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

हिंदूचा गुढीपाडवा आणि मुस्लिम धार्मियांचा पवित्र सण रमजान यंदा एकामागोमाग आले आहेत. दोन्ही सण सलग आले असल्याने नेरूळ पोलीस ठाणे यांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. दोन्ही धार्मियांनी आपले उत्सव आनंदात आणि जातीय सलोखा राखत साजरा करावेत, असे आवाहन नेरूळ पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्राह्मनंद नाईकवडे यांनी केले आहे.

नवी मुंबई शहर सर्वधर्मीय आणि समिश्र नागरिकांची लोकवस्ती असलेले शहर आहे. इथे सुशिक्षित आणि शिक्षित सुजाण नागरिक असून कायदा आणि सुव्यवस्था याचे पालन होते. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद



भारंबे यांनी नवी मुंबईतील सर्वच पोलीस ठाणे प्रशासनाला येणाऱ्या गुढीपाडवा आणि रमजान सणाच्या अनुषंगाने शांतता कमिटी आणि मोहल्ला कमिटीच्या बैठका घेण्याचे आदेश दिले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशाची दखल घेत नेरूळ पोलीस ठाणे हद्दीतील शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी आणि हिंदू-मुस्लिम धर्मीय प्रमुखांची एक बैठक वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्राह्मनंद नाईकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या बैठकीत गुडीपाडवा आणि रमजान सण कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवत जातीय सलोंख्यांनी साजरा करावा, असे आवाहन नाईकवडे यांनी या वेळी केले.

नेरूळ पोलीस ठाणे हद्दीतील सुजाण नागरिकांनी कोणत्याही अफ़वावर विश्वास ठेऊ नये, सोशल मीडियावरील बातम्या, अक्षपार्य मजकूर, दोन्ही धार्मियामध्ये तेढ निर्माण होत असलेले मजकूर संबंधितानी तत्काळ डिलीट करावेत. एखादी व्यक्ती आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करत असल्याचा संशय आल्यास तत्काळ नेरूळ पोलीस ठाणे कडे संपर्क साधावा, असे आवाहनदेखील नाईकवडे यांनी केले आहे.

## नवीन पनवेलमध्ये आज साहित्यिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा व श्री.बापूसाहेब डी.डी.विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल येथे शनिवारी (दि.२९) आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांतर्गत कवितेचा जागर, गुढीपाडव्याचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी दिलेल्या पुस्तकांची ज्ञानरूपी गुढी उभारण्यात येणार असून या ज्ञानरूपी गुढीचे मान्यवरांचे हस्ते पूजन करण्यात येणार आहे, त्याचप्रमाणे सावित्रीच्या लेकी कार्यक्रमांतर्गत कर्तुत्ववान महिला, महिला बचत गट यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम शनिवार २९ मार्च २०२५ सकाळी ११ वाजता, श्री.बापूसाहेब डी.डी.विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल येथे होणार आहे.

या कार्यक्रमासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता किर, आदर्श शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष धनराजजी विसपुते, कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील, रायगड जिल्हा कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष सुधीर शेठ उपस्थित राहणार असल्याची माहिती कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी सांगितले.

# क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमविषयक डॉक्टरांची कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक क्षयरोग दिनानिमित्त नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षयरोग विषयी व्यापक जनजागृती करणेकरीता विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

क्षयरोगाचे निर्मूलन करणेकरीता शासकिय व खाजगी आरोग्य सेवा यांनी एकत्रित काम करणे महत्वाचे आहे. त्याच धर्तीवर नमुंमपा आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत एनआयएमए यांच्या संयुक्त विद्यामानाने खाजगी आयुष वैदयकिय व्यवयायिक यांची क्षयरोग विषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेकरीता आरोग्य विभागामार्फत वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. धनवंती घाडगे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रवीण कटके, वैदयकिय अधिकारी डॉ. निनाद काकडे, डॉ. प्रदिप परदेशी व एनआयएमए अध्यक्ष डॉ.



विनायक म्हात्रे व एकूण ५४ खाजगी आयुष वैदयकिय व्यवयायिक उपस्थित होते.

वैद्यकिय आरोगय अधिकारी डॉ.प्रशांत जवादे यांनी आयुष वैद्यकिय व्यवयायिक ना संबोधित केले व त्यांना क्षयरोग आजाराचे दुरीकरण करणेकरीता बाह्यरुग्ण विभागामध्ये येणाऱ्या जास्तीत जास्त संशयित क्षयरुग्णांची तपासणी करून घेण्याचे आवाहन केले. शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रविण कटके, वैदयकिय अधिकारी डॉ. निनाद काकडे व डॉ. प्रदीप परदेशी यांनी उपस्थित डॉक्टरांना नमुंमपा अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम मार्फत देण्यात येणाऱ्या विविध मोफत निदान, औषधोपचार व प्रतिबंधात्मक उपचाराबाबत सेवेची माहिती दिली. एनआयएमए अध्यक्ष डॉ. विनायक म्हात्रे यांनी क्षयरोग विषयक कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल नमुंमपा आरोग्य विभागाचे विशेष आभार व्यक्त केले.

नमुंमपा, खासगी संस्था व नागरिक एकत्रित आल्यास नवी मुंबईतून क्षयरोगाचे समुळ उच्चाटन करणे शक्य आहे. तरी नवी मुंबई क्षयरोग मुक्त करणेकरीता खाजगी संस्था व नागरिकांनी सर्वोतपरी सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# रसायनीमध्ये रोजगार मेळावा

**रसायनी : प्रतिनिधही**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग, रायगड व पाताळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या सयुंक्त विद्यमाने गुरुवारी (दि.२७) PRIA शाळेचया हॉलमध्ये रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्यास परिसरातील सुमारे २० नियोक्त्यानी (उद्योजकांनी) त्यांचे अधिकारी निवड प्रक्रियांसाठी पाठविले होते, व ४१९ रिक्तपदांची नोंद करण्यांत आली होती.

पाताळगंगा आणि रासायनि इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सुनील कदम, उपाध्यक्ष दिलीप पै, जनरल सेक्रेटरी अनिल घेवरी व एक्सिक्युटीव्ह सेक्रेटरी डी. एस. गुरव यांची प्रमुख उपस्थिती मेळाव्यास होती.

रोजगार मेळाव्याचा लाभ सुमारे ५० लाभार्थ्यांनी घेतला. जिल्हा कौशल्य विकास, अलिबाग,



रायगडच्या असिस्टंट कमिशनर श्रीमती. अमिता मुकुंद पवार यांनी सदर मेळाव्याचे सुनियोजन केले. अशाच तर्हेचा पुढील मेळावा एप्रिल ३, २५ रोजी तळोजा MIDCमध्ये आयोजित कला असल्याची माहिती त्यांनी दिली व जे लाभार्थी आज येऊ शकले नाहीत, त्यांनीही तेथे आवर्जून येण्याचे आवाहन त्यांनी केले.

# निवृत्त प्राचार्य डी.बी.पाटील यांना दि.बा. योद्धा सन्मान



**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

निवृत्त प्राचार्य डी. बी. पाटील यांना मान्यवरांच्या हस्ते दि.बा. योद्धा सन्मानाने गौरविण्यात आले. या मेळाव्याला अध्यक्ष दशरथ पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, माजी खासदार जगन्नाथ पाटील, माजी खासदार संजीव नाईक, कार्याध्यक्ष जे.डी. तांडेल, दीपक म्हात्रे, दि.बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील तसेच आजी-माजी आमदार आणि विविध जिल्ह्यातील प्रमुख नेते तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

लोकनेते दि. बा.पाटील यांचे आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव देण्यात यावे, यासाठी सर्वपक्षीय कृती समिती तसेच अखिल आगरी समाज परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आजी माजी खासदार आमदार तसेच विविध जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांचा मेळावा २२ मार्च रोजी झाला. यामध्ये निवृत्त प्राचार्य डी.बी. पाटील यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जासई शाखेत असताना, गेली तेरा वर्ष हुतात्मा स्मृतिदिन कार्यक्रमाचे आयोजन केले.

पनवेल उरण आगरी समाज मंडळाचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते दि.बा. पाटील साहेबांनी सुरू केलेल्या विविध संस्थांमध्ये निवृत्त प्राचार्य डी. बी. पाटील हे निवृत्तीनंतरही कार्यरत असताना, त्यांनी अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले. सध्या ते अखिल आगरी समाज परिषदेत सहचिटणीस म्हणून कार्यरत आहेत. हुतात्मा हिराजी गोमा पाटील ग्रंथालय व वाचनालयाचे सचिव म्हणून ते आपली जबाबदारी पार पाडत आहेत. आगरी दर्पणचे ते सह व्यवस्थापक आहेत. तसेच ओबीसी बहुजन आघाडीचे सदस्य म्हणून काम पाहत आहेत. आदरणीय माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी निवृत्त प्राचार्य डी. बी. पाटील यांची रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड केलेली आहे.

या सर्व कार्याचा विचार करता त्यांना दि.बा.पाटील योद्धा सन्मान देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच या मेळाव्यात ज्या प्रमुख कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांनाही दि.बा. योद्धा सन्मान देऊन गौरविण्यात आले.



## जनकल्याण संस्थेतर्फे शहीद दिवस

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी येथे जनकल्याण सामाजिक संस्थेच्या वतीने शाहिद दिवस समारोह अपना दल पक्षाचे राज्य प्रभार महेंद्र वर्मी यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.

या वेळी बोलताना अपना दल पक्षाचे महाराष्ट्र राज्य प्रभारी महेंद्र वर्मा म्हणाले की, देशाच्या निर्मितीमध्ये भावी तरुणांच्या खांद्यावर खूप मोठी जबाबदारी आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात शाहिद भगतसिंग सारख्या क्रांतिकारकांचे अमूल्य योगदान विसरले जाऊ शकत नाही. ९४ वर्षानंतरही तरुण पिढ्या त्यांचे विचार आणि प्रेरणा विसरू शकत नाही असे वर्मी यांनी सांगितले.

या वेळी सर्वधर्मीय विकास मंचचे अध्यक्ष मेघनाथ भगत, राजेश शर्मा, संतोष उपाध्याय, सुरेंद्र सरोज, परमेश्वर सिंह, दिनेश चव्हाण, शैलेंद्र तिवारी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या सोहळ्यास संस्थेचे लालजी शर्मा, उमेश शर्मा, रामशरण सिंग, विनोद बाबर,अजेंद्रा आदी उपस्थित होते. सोहळाचे सूत्रसंचालन नेताजी सुभाषचंद्र बोस स्मृती संस्थानचे अध्यक्ष आणि जेष्ठ पत्रकार विनोद प्रधान यांनी केला.

# आरोग्य विभागामार्फत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना नोंदणी

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना २ जुलै, २०१२पासून राज्यात राबविण्यात येत आहे, तर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही केंद्र शासनाची आरोग्य विमा योजना असून २३ सप्टेंबर, २०१८पासून राज्यात लागू करण्यात आली. २६ फेब्रुवारी, २०१९च्या शासन निर्णयान्वये आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेशी सांगड घालून दोन्ही योजना राज्यात एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सुधारीत योजनेची १ एप्रिल २०२०पासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सध्या आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत आरोग्य संरक्षण प्रति कुटुंब प्रति वर्ष पाच लाख रुपये एवढे आहे तर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत आरोग्य संरक्षण प्रति कुटुंब प्रति वर्ष १.५ लाख रुपये एवढे आहे. आता महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गतही आरोग्य संरक्षण प्रति कुटुंब प्रति वर्ष पाच लाख रुपये एवढे करण्यात येत आहे

आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन अरोग्य योजनेचे लाभाथी घटक - सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेत नोंदीत समाविष्ट कुटुंबे, अंत्योदय अन्न योजनेतील कुटुंबे तसेच याशिवाय राज्य शासनाने शिफारस केल्यानुसार केंद्र शासनाने निश्चित केलेली कुटुंबे हे आहेत. राज्यातील कुटुंबे प्रथमत: राज्य शासनाच्या निर्देश नुसार पिवळे व केशरी रेशन कार्डधारक लाभार्थी यांचे आयुष्मान कार्ड काढण्यात येत आहे. आतापर्यंत नमुंमपा अंतर्गत एकूण ४१६४० आयुष्यमान कार्ड आरोग्य कर्मचारी यांच्या मार्फत काढण्यात आले आहेत.

महापालिका आयुक्त यांनी नवी मुंबई शहरातील नागरीकांना PMJAY व MJPJAY या योजने अंतर्गत पाच लाख रुपये प्रति कुटुंब प्रति वर्षासाठी आरोग्य विमा लाभ घेण्याकरीता आयुष्मान कार्ड/MJPJAY कार्ड तयार करून घेण्याकरीता शासनाचे संकेतस्थळ https://setu.pmjay.gov.in/setu/ व https://beneficiary.nha.gov.in वर नोंदणी करणेसाठी आवाहन केले आहे अथवा पात्र लाभार्थी यांनी जवळचा ना.प्रा.आ.केंद्र येथे जावून आयुष्मान कार्ड काढून घेण्यात यावे.

# दिव्यांगासाठी सहाय्यक उपकरणे वाटप



**पनवेल : वार्ताहर**

रा.स्व.संघ जनकल्याण समिती व भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. मुंबई रिफायनरिच्या सी. एस. आर.योजने अंतर्गत दिव्यांगासाठी सहाय्यक उपकरणे वाटप कार्यक्रम पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमाची सुरुवात मंगेश चितळे व प्रकल्प समिती पदाधिकारी यांच्या हस्ते भारत माता प्रतिमेचे पुजान व दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख आतिथी मंगेश चितळे यांचा सत्कार संस्था अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्र यांनी केला. व्यासपीठावरील पाहुण्यांचा सत्कार संस्था कार्यवाह राजीव समेळ यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यंकटेश लामजने यांनी केले. मंगेश चितळे यांनी रुग्णालय करत असलेल्या कामांचे कौतूक केले. दिव्यांगांसाठी असणाऱ्या सरकारी योजना दिव्यांगां पर्यंत पोहचत नाहित तसेच असे बरेच दिव्यांग आहेत ज्यांची नोंदणी होत नाही. काहीजण अंथरूणावर आहेत त्यांना दिव्यांग योजनेचा फायदा मिळत नाही. पनवेल महानगर पालिका यावर काम करत आहे. रा.स्व. संघ जनकल्याण समिती व पनवेल महानगर पालिका मिळून यासाठी चागले काम करु शकू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्या नंतर रुग्णालयची माहिती प्रकल्प अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्र यांनी करून दिली.

महाराष्ट्रात चालणार्या जनकल्याण समितीच्या प्रकल्पांची माहिती प्रमोद क्षिरसागर यांनी करुन दिली. विठ्ठल गाडेकर यांनी दिव्यांगांसाठी महाराष्ट्रात प्रथमच सुरु झालेल्या लातूर येथिल आय. टी.आय ची माहिती दिली. प्रशिक्षण हे मोफत असून वसतिगृहाची सोय उपलब्ध आहे. या संधिचा लाभ दिव्यांगांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास संस्था अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्रे, उपाध्यक्ष डॉ.ययाती गांधी, कार्यवाह राजीव समेळ, सह कार्यवाहीका सौ.अनुराधा ओगले, रा.स्व. संघ जनकल्याण समिती प्रांत सदस्य प्रमोद क्षीरसागर रा.स्व. संघ कोकण प्रांत सह कार्यवाह शरद ओगले, रा.स्व. संघ कुलाबा जिल्हा कार्यवाह श्रीरंग काणे, रुग्णालय मुख्य संचालक व्यवस्थापक सुनील लघाटे, रुग्णालय वैद्यकीय अधिकारी डॉ.भक्ती सारंग तसेच दिव्यांग व रुग्णालय सेवक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रसन्न खेडकर यांनी केले तर आभार राजीव समेळ यांनी मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

# नवी मुंबई महापालिकेत येणाऱ्या अभ्यागतांसाठी वेळनिश्चिती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिक विविध कामांकरिता नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील विविध कार्यालयांमध्ये येत असतात तसेच इतर विभागांतील कार्यालयांनाही भेटी देत असतात. या नागरिकांच्या सूचना, विनंती, तक्रारी समजून घेणे, त्यांच्या अडीअडचणी दूर करणे, शासनाच्या विविध योजना इत्यांदींची माहिती नागरिकांना देणे इत्यादी कामे स्थानिक कार्यालयातील अधिकारी यांचेमार्फत होत असतात. त्यामुळे जनमानसात प्रशासनाची लोकाभिमुख प्रतिमा तयार होते.

या अनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रातील कामाचा आढावा घेणे, त्यांचे पर्यवेक्षण करणे, त्यावर देखरेख ठेवणे इ. जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी अधिकारी यांस कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी द्याव्या लागत असल्याने कार्यालयात विविध कामांसाठी भेटीस येणाऱ्या नागरिकांना भेट देऊन त्यांचे म्हणणे जाणून घेणे व त्यांच्या तक्रारींची दखल घेणे व त्यांचे समाधान करणे तितकेच आवश्यक आहे.

या संदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या २७ मे २०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार, नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील अधिकारी यांनी त्यांच्याकडे भेटीसाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी भेटण्याची वेळ दुपारी ३ ते ५ निर्धारित करण्यात येत असल्याचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विशेष परिपत्रकाव्दारे निर्देशित केले आहे. आहे. याकरिता अधिकारी यांनी आठवड्यातील दिवस निश्चित करावेत व या कालावधीमध्ये शक्यतो विभागांतर्गत बैठकांचे आयोजन करण्यात येऊ नये, असेही सूचित करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे क्षेत्रीय पातळीवरील प्रत्येक कार्यालयातील अधिकाऱ्यांनीही नागरिकांच्या भेटीसाठी निश्चित वेळ राखून ठेवावा व तो वेळ शक्यतो दुपारनंतर ठेवण्यात यावा. तसेच या राखीव वेळात शक्यतो बैठकांचे आयोजन करण्यात येऊ नये, असे सूचित करण्यात आले आहे. कर्तव्याचा भाग म्हणून करावयाचे दौरे वा भेटी यासाठी आठवड्यातील ठराविक दिवस निश्चित करावेत व त्याची माहिती कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावी, जेणेकरून नागरिकांना सुविधाजनक ठरेल, असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने महानगरपालिका मुख्यालयात येणाऱ्या अभ्यागतांकरिता मुख्य प्रवेशद्वार क्र.१ येथून दुपारी २.०० नंतर प्रवेश देण्यात येणार असून सुरक्षा विभागामार्फत अभ्यागतांच्या प्रवेशाकरिता संबंधित विभागप्रमुख यांच्या सूचनेनुसार प्रवेशिका देण्यात येईल.

नागरिकांचा वेळ महत्त्वाचा असून त्यांच्या श्रम, मूल्य व वेळेत बचत व्हावी आणि कामकाजात सुनियोजितता यावी यादृष्टीने अभ्यागत भेटीची वेळ व प्रक्रिया महत्त्वाची असून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे.

# श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती अनधिकृत स्टॉल्सचे अतिक्रमण

## वनविभाग व नगर परिषदेने लक्ष देण्याची मागणी



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती नगरपरिषदेच्या रस्त्याच्या कडेला, त्याचप्रमाणे वनखात्याच्या जागेवरती खाद्यपदार्थांच्या स्टॉल्स वाल्यांचा विळखा पडला असून सदर प्रकारामुळे श्रीवर्धन शहरातील हॉटेल व्यावसायिक अडचणीत आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनारी नगरपरिषदेच्या मालकीच्या रस्त्याच्या कडेला अनेक स्टॉल धारकांनी अतिक्रमण केले असून, सदर स्टॉल धारकांमुळे अनेक वेळा समुद्रकिनारी वाहतूक कोंडी झालेली पाहायला मिळते. श्रीवर्धन समुद्रकिनारी वनखात्याची जागा असून या जागेवरती अनधिकृत स्टॉल धारकांनी आपला कब्जा तयार केला आहे. विशेष करून वनविभागाच्या जागेतून समुद्रकिनाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरती अनेक स्टॉल धारकांनी आपल्या जागा अडवून स्टॉल उभे केले आहेत. स्टॉल उभे करण्यासाठी जुन्या साड्यांचा वापर केल्यामुळे समुद्रकिनारा विद्रुप दिसत आहे. शासकीय विश्रामगृहाच्या बाजूला काही स्टॉल धारक हे अत्यंत जुने असून ते अनेक वर्षे धूप प्रतिबंधक बंधाऱ्याजवळ आपला व्यवसाय करत आहेत. तसेच फेस्टिवल बीच च्या बाजूला देखील काही जुने स्टॉल धारक आपला धंदा करत आहेत.

परंतु दिवसेंदिवस रस्त्यावरती अतिक्रमण करून पदार्थांचे स्टॉल टाकण्याचा मानस अनेक स्टॉल धारकांकडून दिसून येत आहे. या सर्व प्रकारामुळे श्रीवर्धन शहरातील हॉटेल व्यवसायिक अडचणीत आले आहेत. कारण हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकाला बसण्यासाठी आसन व्यवस्था, डोक्यावरती पंखा, तसेच पिण्याच्या पाण्यासाठी ग्लास इत्यादी वस्तू द्याव्या लागतात. तसेच खाद्यपदार्थांचा दर्जा उत्तम राखण्यासाठी त्या प्रकारच्या दर्जाचे खाद्यपदार्थ द्यावे लागतात व शासनाचे सर्व अधिकृत परवाने देखील घ्यावे लागतात.

मात्र अनधिकृतपणे स्टॉल्स चालवणाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारचे शासनाची परवानगी नसून उघड्यावरती अन्नपदार्थ शिजवून ते येणाऱ्या ग्राहकांना पुरविले जातात. अनेक स्टॉल धारक येणाऱ्या पर्यटकांना आपल्या स्टॉलवर मच्छी देखील तळून देतात. त्याचप्रमाणे जेवण देखील बनवून देतात. या सर्व प्रकारामुळे जे अधिकृत हॉटेल व्यवसायिक आहेत त्यांच्या व्यवसायावरती परिणाम होत असल्याचे दिसत आहे.

तरी श्रीवर्धन नगरपरिषदेने व वनविभागाने त्यांच्या अखत्यारीत असलेल्या जागेवरचे अनधिकृत स्टॉल तातडीने हलवावेत, अशी मागणी श्रीवर्धन मधील सर्व हॉटेल व्यवसायिकांकडून केली जात आहे.

# दोन लाख किमतीची सोन्याची चेन केली परत



युवकांचा प्रामाणिकपणा: सर्वत्र कौतुक

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणेजवळील वासगाव या ठिकाणी मंगळवार दि.२४ मार्च रोजी सुधागड तालुक्यातील गौळमाळ गावातील रहिवासी सुरेश गंगाराम बरगे हे रात्री हळदी समारंभ कार्यक्रमासाठी कुटुंबासहित गेले होते. त्या ठिकाणी जमलेल्या वर्दळीत त्यांच्या गळ्यातील दोन तोळे सोन्याची चेन हरवली होती.

ही बाब त्यांच्या लक्ष्यात आली असता सुरेश बरगे यांनी ही घटना दुसऱ्या दिवशी वासगाव येथील आपल्या नातेवाईकांच्या कानावर टाकली. दरम्यान या गावातील दोन युवक संदीप बावधाने व विलास कोकरे यांना जवळपास दोन लाख किमतीची दोन तोळे सोन्याची चेन रात्री सापडली होती. त्यांना ही चेन सुरेश बरगे यांची असल्याची खात्री पटताच त्यांनी त्यांच्याशी संपर्क साधून तत्काळ त्यांच्या ताब्यात सुपूर्द केली. आपली हरवलेली दोन लाख किमतीची सोन्याची चेन परत मिळाल्याने सुरेश बरगे हे आनंदी झाले असून दोन्ही तरुणांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

वासगाव गावातील युवक संदीप बावधाने व विलास कोकरे या दोन तरुणांनी प्रामाणिकपणा दाखवत इमानदारीने सोन्याची चेन परत केल्याने संपूर्ण रोहा तालुक्यासह सुधागड तालुक्यातील नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडून फोनकरून, प्रत्यक्ष भेटून तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

# गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांनी ई–श्रम पोर्टलवर नोंदणी करावी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाने गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी ई–श्रम पोर्टलवर नोंदणीसाठी सुविधा उपलब्ध करून दिलेली असून नोंदणी करून घेण्यासाठी पात्र गिग कामगारांनी http://register.eshram.gov.in//user/platform-worker-regitration, या अधिकृत लिंकवर जाऊन त्वरित नोंदणी करावी, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत प्लॅटफॉर्म इकोनॉमी भारतात आणि जागतिक स्तरावर रोजगार निर्मितीचे एक मोठे साधन बनले आहे. लाखो गिग कामगार या क्षेत्रात कार्यरत आहेत आणि त्यामुळे त्यांना सुरक्षित भविष्यासाठी सरकारी योजनांचा लाभ मिळावा म्हणून केंद्र शासनामार्फत गिग कामगारांच्या नोंदणीचा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे.

ई–श्रम पोर्टलवर नोंदणी केलेल्या गिग कामगारांना विविध सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे ओला, उबेर, रॅपिडो, झोमॅटो, स्विगी, झेपटो, ब्लिंकीट, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मिशो, अरबन क्लॅप यासारख्या प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या डिलिव्हरी बॉय, राइडर, ड्रायव्हर आणि इतर गिग कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# सुधागड पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्रदान



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सुधागड पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांच्या हस्ते पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी अधिकारी लता मोहिते यांना गुरुवारी (दि.२७) आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे आयएसओ मानांकन मिळवणारी सुधागड पंचायत समिती रायगड जिल्ह्यातील पहिली पंचायत समिती ठरली आहे.

शासन व्यवहारात पारदर्शकता तसेच गतिमानता यावी यासाठी ई–गव्हर्नन्सचा वापर केला जात आहे. ग्रामपंचायतीमधील विविध रजिस्टर्स,फॉर्मस, दस्ताऐवजांचे संगणकीकरण करून पेपरलेस ग्रामपंचायतींकडे वाटचाल सुरू आहे. बदलत्या परिस्थितीत ग्रामपंचायतींची कार्यपद्धतीचे पुर्विलोकन करून व्यवसाय प्रक्रिया पुनर्निर्मिती करण्याची गरज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रशासकीय कामकाज कार्यक्षम व्हावे आणि कार्यपद्धतीत गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आयएसओ प्रमाणिकीकरण करण्याचा निर्णय राज्य सरकारने २०१९ मध्ये घेतला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील पंचायत समिती व ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन मिळावे, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.

सुधागड पंचायत समितीन प्रशासनाने कार्यालयाचे सुशोभीकरण, पंचायत समितीचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवणे, तालुक्यातील ग्रामपंचायतींचे नियोजन, सभेत नियमित विषयांवर चर्चा, वृक्षारोपण करणे यासह शासकीय योजना राबविण्यावर भर दिला आहे.

जिल्ह्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या पंचायत समिती व ग्रामपंचायतीना आयएसओ करण्यासाठी व्हि.एन.टेक्नो. रिसर्च प्रा.लि. कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांच्या हस्ते पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी अधिकारी लता मोहिते यांनी आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी अविनाश घरत, तालुका कृषी अधिकारी मिलिंद चौधरी, विस्तार अधिकारी सुनील आहेर, सहाय्यक प्रशासन अधिकारी राजन थळे उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी महिलांवरील लैंगिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ

**पेण : प्रतिनिधी**

सार्वजनिक ठिकाणी महिलांवरील लैंगिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असून, या पार्श्वभूमीवर पारंपरिक विचारसरणी आणि भारतीय संविधानातील मूल्यांचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले. त्या अंकुर ट्रस्ट आणि महिला अत्याचार विरोधी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण सत्रात बोलत होत्या.

यावेळी मंचाच्या शैला धामणकर, कविता पाटील, संयोगिता टेमघरे, इनरव्हील क्लबच्या गीता पाटील, ज्योती अवघडे, रुची महलकर आणि कीर्ती सावंत आदी मान्यवर उपस्थित होत्या.

त्यांनी संविधान आणि मनुस्मृतीच्या तुलनेवर प्रकाश टाकला. संविधानातील महिलांच्या समान हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी यंदाच्या गुढी पाडव्याला 'स्त्री अस्मितेची गुढी' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगितले



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसा साठेकरार ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नेरेपाडा, ता. पनवेल, जि. रायगड,**

| सर्व्हे नं. गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १२१ | – | ० – ५५– ९०<br>पो.ख. ० – ०४ – ८०<br>एकूण ० – ६० – ७० | ८.७८ | राजेश्री एकनाथ भोपी |
| वरील एकूण असलेले क्षेत्र **० – ६०– ७० हे. आर. पॉ. पैकी** राजेश्री एकनाथ भोपी यांचे हिश्याचे क्षेत्र ० – १८ – ८४ हे. आर. पॉ., पो. खराबा ० – ०२ – ४० हे. आर. पॉ. एकूण क्षेत्र ० – २१ – २४ हे. आर. पॉ, आकार २.९६ रू. पैसे या मिळकती | | | | |

**पनवेल.**
**दिनांक : २९/०३/२०२५.**

**सही/–**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
**शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,**
**प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,**
**नवीन पनवेल, जि. रायगड**

## PANVEL MUNICIPAL CORPORATION

**Tender No. PMC/CE/PMAY/300/2024-25**

The Commissioner Panvel Municipal Corporation invites online bids **(B-1Tender)** for the construction of work detailed in the table. The bidders may submit bids the following works.

**TABLE**

| Sr.No. | Name of Work | Approximate value of work (Rs.) | Bid Security (Rs.) | Cost of Document (Rs.) | Period of completion |
|---|---|---|---|---|---|
| 1 | CONSTRUCTION OF RESIDENTIAL BUILDING (G+ 7) COMPRISING BLDG-I FPR LEPROSY AFFECTED PEOPLE &. BLDG-2 FOR OPEN SALE/ OTHER PURPOSE ON PLOT NO. 389, PANVEL UNDER PMAY SCHEME IN PANVEL MUNICIPAL CORPORATION AREA. | 14,58,36,238.11 (Biddable) + 19,26,433.26 (Non Bidable) | 7,30,000/- | 5000)+18% GST = 5900/- (Non) Refundable) | (24 months) 'Twenty four' months (Including) monsoon) |

| | |
|---|---|
| 1 | Bid form, conditions of contract, specifications and contract drawings can be downloaded from the e- tendering portal of urban Development Department, Gov .of Maharashtra. http://mahatenders.gov.in. Further information regarding the work can be obtained from the office of the undersigned. Bidders can avail the e-tender document **from 02.04.2025 from 5.00 P.M. to 30.04.2025** up to 5.00 PM. |
| 2 | The fees of bid document amounting to Rs. 5900/- (including GST) shall be paid online through the payment gateway. The fees of the tender document will be non-refundable. |
| 3 | The bids are to be submitted online only. |
| 4 | Other details can be seen in the bidding documents. |

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.१३४/१३४/२०२५
दिनांक :- २८/०३/२०२५

**Sd/-**
**Additional Commissioner- I**
**Panvel Municipal Corporation**
**Panvel-410 206**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, मौजे बोपेले ता. कर्जत –जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं./प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| भूषण मोहन सोनकुसरे | ४७/२/अ/४ | ४६२ चौ.मी. | ४६.२० |
| | ४७/२/अ/५ | ५८० चौ.मी. | ५८.०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिध्द झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

दिनांक : २९/०३/२०२५

**सही/–**
**ॲड. अशोक पालू डुकरे**
**रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,**
**ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड**
**फोन नं. ९८८१२७९८१७**

## पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की. खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे– तळोजे मजकूर या महसूली गावातील सर्व्हे नं. ११३ मधील विद्यमान रस्त्यापासून ते मौजे– तुर्भे या महसूली गावातील सर्व्हे नं. ४८ पर्यंत २४.०० मी. रूंदीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५, २०६, २०७ व २०९ नुसार तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजना रस्त्याचे व ना–बांधिव क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज. लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :– मौजे तुर्भे, ता. पनवेल येथील श्रीम. तेजश्री राजेश म्हात्रे व इतर यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित २४.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधीत व ना– बांधिव क्षेत्र पुढीलप्रमाणे :–

**१) मौजे – तुर्भे, सर्व्हे नं. १/४ रस्त्यासाठी बाधीत व ना– बांधिव क्षेत्र – ८८०.०० चौ. मी.**

**त्यास मोजणी नकाशानुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे–**

**पुर्वेस : लागून हिस्सा नं. १/६, १/७**
**पश्चिमेस : लागून हिस्सा नं. १/३**
**दक्षिणेस : लागून हिस्सा नं. १/५**
**उत्तरेस : लागून हिस्सा नं. १/१, १/२**

टिप :– उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

जा क्र. – पमपा/नरवि/
टिडीआर/२६–२५/८०७/२०२५

**सही/–**
**सहाय्यक संचालक, नगररचना**
**पनवेल महानगरपालिका**
**पनवेल– रायगड**

# लखनौचा हैदराबादवर विजय

## पूरन-मार्शच्या फलंदाजीने घेतला 'त्या' पराभवाचा बदला



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

लखनौ सुपर जायंट्स संघाने वादळी फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या हैदराबादविरूद्ध विस्फोटक फलंदाजी करत पाच विकेट्सने विजय मिळवला. लखनौच्या संपूर्ण संघाने उत्कृष्ट कामगिरी करत हैदराबादला सामन्यात कायमच बॅकफूटवर ठेवले. गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजांवर आळा घातला. तर निकोलस पूरन आणि मिचेल मार्शने हैदराबादच्या गोलंदाजांची धुलाई करत गतवर्षीच्या पराभवाचा व्याजासकट बदला घेतला. या विजयासह लखनौने आयपीएल २०२५च्या गुणतालिकेत आपले खाते उघडले आहेस्थहैदराबादने दिलेल्या १९२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौला सुरूवातीच्या षटकांमध्ये धक्का बसला. पण नंतर निकोलस पूरन आणि मिचेल मार्शने वादळी फलंदाजीसह मात्र हैदराबादला सामन्यात पुन्हा परतण्याची संधी दिली नाही. मिचेल मार्शने ३१ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५२ धावांची खेळी करत सलग दुसरे अर्धशतक केले. तर निकोलस पूरनच्या खेळीने हैदराबादच्या गोलंदाजांची शाळा घेतली. यानंतर ऋषभ पंतने १५ धावांची खेळी केली, तर आयुष बदोनी ६ धावा करत बाद झाला. यानंतर मिलरने विजयी चौकार मारत १३ धावा केल्या. तर अब्दुल समदने ८ चेंडूत २ चौकार आणि २ षटाकारांसह महत्त्वपूर्ण २२ धावांची विस्फोटक खेळी करत संघाला २४ चेंडू राखून विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या हैदराबादला वादळी सुरूवात करू दिली नाही. हैदराबादच्या फलंदाजीला आळा घालण्याचं काम शार्दुल ठाकूरने केलं. त्याने त्याच्या ४ षटकांच्या स्पेलमध्ये ११ डॉट बॉल टाकले. चांगल्या सुरूवातीसह शार्दुलने हैदराबादला सुरूवातीचे दोन धक्के दिले. अभिषेक शर्मा ६ धावा करत बाद झाला, तर इशान किशन गोल्डन डकवर बाद झाला. यानंतर ट्रॅव्हिस हेडने संघाचा डाव सावरत ४७ धावा केल्या पण तोही क्लीन बोल्ड झाला. नितीश रेड्डीने ३२ धावा केल्या तर क्लासेन २६ धावा करत रनआऊट झाला.

यानंतर अनिकेत वर्माने ५ षटकारांसह ३६ धावांची वादळी खेळी केली. तर कमिन्सनेह १८ धावांचे योगदान दिले. तर हर्षल पटेल १२ धावा करत बाद झाला. अशारितीने हैदराबादचा संघ १९० धावा करू शकला. शार्दुल ठाकूरने ४ षटकांत ३४ धावा देत ४ विकेट्स घेतले. तर आवेश खान, दिग्वेश राठी, प्रिन्स यादव आणि रवी बिश्नोई यांनी १-१ विकेट घेतली.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर विद्यालयाची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत विशेष कामगिरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड व पनवेल महापालिका यांच्या वतीने शालेय क्रीडा स्पर्धांचे जिल्हास्तरावर आयोजन करण्यात येते. या स्पर्धेत विशेष कामगिरी करून प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यालयांची गुणानुक्रमे निवड करून रोख पारितोषिक वितरित करण्यात येते. यामध्ये रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विशेष कामगिरी केली. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये झालेल्या क्रीडा स्पर्धांसाठी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाने आयोजित केलेल्या स्पर्धेत रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर या विद्यालयास शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हास्तरावर १७ वर्ष मुले व मुली या गटात गुणानुक्रमे सर्वाधिक ५९१ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्यासाठी प्रोत्साहन अनुदान रोख रक्कम रुपये ८३ हजार ५३९ प्राप्त झाले. तसेच १९ वर्ष मुले व मुली या गटात गुणानुक्रमे सर्वाधिक ५१८ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्यासाठी प्रोत्साहन अनुदान रोख रक्कम रुपये ८३ हजार ५३९ प्राप्त झाले. या दोन्ही वयोगटात सर्वाधिक सहभाग व सर्वाधिक प्राविण्य मिळविल्याबद्दल प्रोत्साहनात्मक अनुदानाची रक्कम रुपये एक लाख ६७ हजार ७८ रुपये देऊन गौरविण्यात आले. क्रीडा क्षेत्रातील विद्यालयाची ही उल्लेखनीय कामगिरी आहे.



महाराष्ट्रातील शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवून विशेष कामगिरी करणाऱ्या माध्यमिक शाळांना राज्य शासनाने प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याची योजना राबविली आहे. या योजनेंतर्गत, शालेय क्रीडा महासंघाद्वारे आयोजित स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शाळांना आर्थिक सहाय्य प्रदान केले जाते.

विद्यालयाला मिळालेल्या या अनुदान रकमेमुळे विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात उत्कृष्टता साधण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. विद्यालयाचे अनेक विद्यार्थी दरवर्षी या स्पर्धांमध्ये सहभागी होऊन उज्ज्वल यश संपादन करतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना चालना मिळाली आहे आणि भविष्यातील क्रीडा क्षेत्रातील राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत १७ व १९ वर्षे वयोगटात मुले व मुली यांनी सर्वाधिक सहभाग घेऊन विशेष कामगिरी करत गुणानुक्रमे प्रथम स्थान मिळवून प्रोत्साहनात्मक अनुदान प्राप्त झाल्याबद्दल विद्यालयाचे खेळाडू व त्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन करणारे उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील व माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक संभाजी जाधव यांचे संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य संजय भगत व प्रभाकर जोशी, संस्थेचे सचिव गडदेसर यांनी अभिनंदन केले.

या विशेष कामगिरीसाठी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर व माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले.



# रॉयल रायगड स्टार संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

दुसऱ्यांना वस्तूरूपी सेवा देण्याच्या कामातून स्वतः साठी एक दिवस मौजमजा करता यावी म्हणून अलिबाग तालुका सेल्स टीमच्या वतीने अलिबाग सेल्स प्रीमिअर लीग या ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रॉयल रायगड स्टार संघाने चॅम्पियन चॅलेंजर संघाला पराभूत करून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

अलिबागजवळील वाडगाव येथील मैदानावर खेळविण्यात आलेल्या या स्पर्धेत तालुक्यातील आठ संघ सहभागी झाले होते. सर्वांनी या स्पर्धेचा मनमुराद आनंद लुटला.

स्पर्धेचे उद्घाटन वाडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सारिका पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत, माजी सरपंच सरिता भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सेल्स टीमचे मयूर पाटील, मिलिंद भालवणकर, संदेश पवार, महेंद्र म्हात्रे, तुषार मयेकर तेजस गिरी, भूषण राऊत, सुनील कावजी, सचिन पाटील, राजू नगरकर, संतोष भोईलकर, संदेश घरत, ओंकार पाटील, चेतन सोनार, भूषण सोनार, संदेश ठाकूर, रोहन माळवी, निकेश पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# 'प्रिया' प्रीमियर लीगचा रिलायन्स इंडस्ट्रीज संघ विजेता

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

पाताळगंगा आणि रसायनी परिसरातील उत्पादक कारखान्यांनी १९८३ साली स्थापन केलेल्या पाताळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज असोसिएशन (प्रिया)तर्फे 'प्रिया' प्रीमियर लीग २०२५ या मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मोहोपाडा एमआयडीसी परिसरातील एनआयएसमच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट स्टेडियमवर स्पर्धा झाली.



या स्पर्धेत २२ कारखान्यांच्या संघांनी सहभाग घेतला होता. त्यातून उत्कृष्ट कामगिरी करत रिलायन्स इंडस्ट्रीज संघाने विजेतेपद पटकावले, तर एस.एच. केळकर संघ उपविजेता ठरला. ओटीकेर संघ तिसऱ्या क्रमांकावर राहिला. विजेत्या संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे आयुक्त रविराज इळवे यांनी या स्पर्धेचे कौतुक करताना म्हणाले की, कारखान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थेने कामगारांच्या आनंदासाठी घेतलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. समाधानी आणि आनंदी कामगार हेच औद्योगिक यशाचे रहस्य आहे.

असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष सुनील कदम यांनी सांगितले की, या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामुळे प्रेरित होत असोसिएशन भविष्यातही अशाच सर्वसमावेशक उपक्रमांचे आयोजन करेल. यामुळे औद्योगिक क्षेत्रांमध्ये एकात्मता वाढेल आणि संपूर्ण महाराष्ट्र व देशाच्या प्रगतीस हातभार लागेल. नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या धोरणांमध्ये आवश्यक बदल मान्य करण्यात आले असून त्यामुळे नव्याने येणाऱ्या सदस्यांनाही अधिक फायदा होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएशनचे पदाधिकारी व कर्मचारी, सहभागी संघ आणि प्रायोजक यांनी योगदान दिले.

# समर्थ चषक क्रिकेट स्पर्धेला रसिक प्रेषकांचा उत्तम प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

समर्थ चषक ही क्रिकेटची स्पर्धा नऊ वर्षे झाली आहे. यंदाचे १० वे वर्ष आहे. क्रिकेट खेळाडू आणि प्रेक्षक यांच्या मागणीमुळे ही स्पर्धा होत आहे. कारण कोरोनाकाळामुळे ही स्पर्धा बंद करण्यात आली होती. २६ मार्च २०२५ रोजी सुरू झालेली ही स्पर्धा ३० मार्च २०२५पर्यंत चालू राहील. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



स्पर्धेतून चांगले खेळाडू निर्माण व्हावेत. त्यांना मोठ्या स्पर्धा खेळण्याचा अनुभव मिळावा ह्यासाठी हे स्पर्धा ठेवण्यात आले आहेत. कारण १२ वर्षांच्या अगोदर येथे एक लाखाच्या स्पर्धा होत नसत आणि ही एक लाखाची स्पर्धा उरण पूर्वविभागात प्रथमच समर्थ चषक स्पर्धेद्वारे आयोजित करण्यात आली. या स्पर्धेला सर्वच स्तरातून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे मत स्पर्धेच्या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी व्यक्त केले.

या स्पर्धेसाठी आयोजक भारतीय जनता पक्षाचे तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, दिघाटीचे माजी सरपंच अमित पाटील, समीर पाटील, भार्गव म्हात्रे, संदीप गावंड, निलेश पाटील, महेश गावंड, नितीन म्हात्रे, अजित जोशी, गजानन गावंड, कल्पेश गावंड, नरेंद्र गावंड, पंकज गावंड, जितेंद्र गावंड, के. वाय.गावंड माजी सरपंच, प्रमोद म्हात्रे प्राध्यापक, रवी म्हात्रे, पी.के. पाटील, विशाल गावंड, प्रिंस गावंड, आमिष गावंड, नवीन गावंड, अनाधी गावंड आणि उरण तालुक्यातील, पंच क्रोशीतील तील प्रेषक, आजी माजी खेळाडू, श्री.गणेश महिला मंडळ, गावंड कुटुंब यांनी भरपूर मेहनत घेत आहेत. उत्तम आयोजन व नियोजन असल्यामुळे स्पर्धेच्या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होत आहे.

# महाराष्ट्राची कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी

**मुंबई :** महाराष्ट्राच्या मुलांनी ३४व्या किशोर/किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत दोन्ही विभागात दणक्यात विजयी सलामी दिली. गया, बिहार येथील जी. डी. गोयंका पब्लिक स्कूल, रसलपूर येथील क्रीडांगणात मॅट वर झालेल्या मुलींच्या ब गटात महाराष्ट्राने मणिपूरचा ६९-११ असा धुव्वा उडविला. पहिल्या सामन्यात झंझावाती सुरुवात करीत महाराष्ट्राने पहिल्या डावातच २लोण २८-०४ अशी भक्कम आघाडी घेतली. दुसऱ्या डावात आपल्या आक्रमणाची धार आणखी वाढवित प्रतिस्पर्ध्यावर आणखी ४ लोण देत हा विजय सोपा केला. महाराष्ट्राच्या मुलींच्या गटात राजस्थान व मणिपूर असे तीन संघ आहेत.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com